RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
मराठी अक्रॉस मुंबई
संपादक - संजय मंगेश भैरे
वर्ष: ११ अंक :२३ ■ मुंबई, मंगळवार ५ ते ११ मे २०२६
मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

**...तोपर्यंत कुठल्याही राजकारण्याने माझ्या घरी येऊ नये**
**पीडित मुलीच्या वडिलांची भावनिक भूमिका**
पान २ वर

**आता एक कोटी लखपती दीदीचे लक्ष्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन**
पान ३ वर

# गंगोत्री ते गंगासागर 'कमळमय' - मोदी

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल आणि आसाम विधानसभा निवडणुकांमध्ये मिळालेल्या अभुतपूर्व यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचे कौतुक करत विजयाचे श्रेय त्यांच्या दीर्घकाळाच्या परिश्रमांना दिले. पश्चिम बंगालमधील भाजपची ही ऐतिहासिक कामगिरी अनेक पिढ्यांपासून काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांच्या संघर्षामुळेच शक्य झाली आहे. मी सर्वांना सलाम करतो, असे उद्गार पीएम मोदींनी काढले.

नवी दिल्लीतील भाजप मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी 'भारत माता की जय'च्या घोषणेसह आपल्या भाषणाची सुरुवात करत हा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व असल्याचे म्हटले. पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये पक्षाला मिळालेल्या मोठ्या यशाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, आज देशातील २० हून अधिक राज्यांत एनडीए-भाजप सरकार कार्यरत आहे आणि नागरिकांच्या सेवेमुळेच जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

मोदी पुढे म्हणतात, "जिथे भाजप, तिथे सुशासन." हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि बिहारमधील विजयासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यशाचाही त्यांनी उल्लेख केला. पंतप्रधानांनी यावेळी पुडुचेरीतील जनतेचे आभार मानत तेथील विकासासाठी एनडीए सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले. तसेच आसाममध्ये तिसऱ्यांदा भाजपवर जनतेने दाखवलेल्या विश्वासाला ऐतिहासिक घटना संबोधत राज्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. केरळ आणि बंगालमधील भाजप कार्यकर्त्यांनी प्रचंड दडपशाही आणि अत्याचारांचा सामना केला आहे. आज बंगालमधील भाजपच्या यशाचे श्रेय मी अशा सर्व कार्यकर्त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देतो. हा विजय मी बंगालच्या जनतेला समर्पित करतो. डॉ. श्यामाप्रसाद यांच्या आत्म्याला आता शांती लाभली. बंगालच्या जनतेने आम्हा भाजप कार्यकर्त्यांना, त्यांचे स्वप्नातील बंगाल साकार करण्याची संधी दिली आहे. आजपासून बंगालच्या नशिबात एका नव्या अध्यायाची भर पडली आहे. जरी ४ मेची संध्याकाळ आता मावळत असली, तरी बंगालच्या या पवित्र भूमीवर एका नव्या पहाटेचा उदय झाला आहे. गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत कमळच कमळ फुलले आहे. गंगा किनाऱ्यावरील बहुतांश राज्यांत आता भाजप-एनडीएची सत्ता आहे, असे सांगत त्यांनी पक्षाच्या विस्ताराचा उल्लेख केला.

## मुंबई भाजपा कार्यालयात जल्लोष



**मुंबई, प्रतिनिधी**

देशातील जनतेला एकच गोष्टी माहिती आहे की, 'मोदी है तो मुमकिन है'. पश्चिम बंगालला कुशासनातून बाहेर काढण्याचे काम जनतेने केले आहे. ३० वर्षे काँग्रेस, ३६ वर्षे कम्युनिस्ट आणि या दोघांपेक्षा भयंकर ममता बॅनर्जी यांचे शासन होते. पश्चिम बंगाल देशातील पहिले औद्योगिक राज्य होते. सात हजार उद्योग तिथून सोडून गेले. पश्चिम बंगालची अवस्था जंगलराज झाली होती. पण पंतप्रधान मोदी यांनी जे व्हिजन मांडले, जो आशेचा किरण दाखवला त्यावर लोकांनी विश्वास दाखवला. जनतेला हा विश्वास बसला की पश्चिम बंगालचे परिवर्तन कुणी करू शकते, तर त्या व्यक्तीचे नाव नरेंद्र मोदी हेच आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हा दिवस सगळ्यांसाठी ऐतिहासिक आहे. पश्चिम बंगालमध्ये गेलो होतो, तेव्हा पत्रकार परिषदेत तिथल्या एका पत्रकाराने विचारले होते की, ममतादीदी म्हणतात भाजपा आणि त्यांचे नेते बंगालच्या बाहेरचे आहेत. बाहेरचे लोक मते मागतात. मी पत्रकारांना सांगितले की, भाजपाची स्थापना ज्यांनी केली, ते श्यामाप्रसाद मुखर्जी हेच पश्चिम बंगालचे होते, त्यामुळे खऱ्या पश्चिम बंगालचा पक्ष कोणता असेल, तर तो भारतीय जनता पक्ष आहे. पश्चिम बंगलाच्या जनतेने ममता दीदींना दाखवून दिले की, पश्चिम बंगालचा खरा पक्ष कोणता आहे. पश्चिम बंगालच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास ठेऊन नुसते परिवर्तन नाही, तर महापरिवर्तन करून दाखवले. ते इतके आहे की, दोन तृतीयांश संख्याबळ भाजपाला मिळते आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

दरम्यान, पंतप्रधान मोदींवरचा विश्वास जनतेने मतपेटीतून दाखवला आहे. आपले मास्टर स्ट्रॅटेजिस्ट आणि आधुनिक राजकारणातील चाणक्य अमित शाह यांनी ज्या प्रकारे योजना तयार केली आणि आपले नेतृत्व काय आहे, ते दाखवून दिले. तसेच आपले राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, नेते शुभेंदू अधिकारी यांच्यासह मी सगळ्यांचे अभिनंदन करतो. पश्चिम बंगलचा विजय हा केवळ एका राज्याचा विजय नाही. पश्चिम बंगालचा विजय हा भारतात होणारी घुसखोरी, भारतावर होणारे हल्ले यापासून भारताला वाचवणारा विजय आहे, असेही फडणवीस म्हणाले.

## 'लेडी सुपरकॉप' मीरा बोरवणकर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी राज्य सरकारने अखेर अत्यंत अनुभवी आणि कणखर अशा नेतृत्वाची निवड केली आहे. निवृत्त आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांची या पदावर नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त होते. बोरवणकर यांच्या नियुक्तीचे सर्वच स्तरांतून स्वागत होत आहे.



पोलीस दलात आपल्या धाडसी आणि परिणामकारक कामगिरीमुळे 'लेडी सुपरकॉप' अशी ओळख निर्माण करणाऱ्या मीरा बोरवणकर यांना कठीण आणि संवेदनशील प्रकरणे हाताळण्याचा मोठा अनुभव आहे. १९८१ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी असलेल्या बोरवणकर या महाराष्ट्र केडरमधील पहिल्या महिला आयपीएस अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक गुंतागुंतीच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास झाला असून गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

पोलीस सेवेत असताना प्रशासन, तपास आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या क्षेत्रात त्यांनी आपली स्वतंत्र छाप उमटवली होती. आता राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून त्यांच्याकडे महत्त्वाच्या जबाबदाऱ्या असणार आहेत महिलांच्या हक्कांचे प्रभावी संरक्षण करणे, अत्याचारग्रस्त महिलांना जलद न्याय मिळवून देणे, महिला सक्षमीकरणाच्या शासकीय उपक्रमांना गती देणे.

दरम्यान, त्यांच्या कार्यक्षमतेचा आणि अनुभवाचा महिलांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीत निश्चितच मोठा उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासकीय पकड आणि सामाजिक प्रश्नांची जाण असलेल्या बोरवणकर यांच्या नियुक्तीमुळे महिला आयोगाच्या कामकाजात अधिक स्पष्टता आणि वेग येईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# तीन राज्यांत सत्तांतर




**कोलकात्ता (पश्चिम बंगाल),**

भारतीय जनता पक्षाचे पितामह डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बंगाल च्या भूमीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी कमळ फुलवले. पंधरा वर्षांपासून सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाचा हा गड ढासळला आहे.



विधानसभेच्या २९४ पैकी २९३ जागांवरील मतमोजणीला सकाळी ८ पासून सुरवात झाली. एका जागेसाठी २१ मेस मतदान आणि २४ मेस मतमोजणी होत आहे. आज मतमोजणीच्या वेळी तृणमूल आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये राड्याच्या घटना घडल्या आहेत. ममता यांच्या घरासमोर जोरदार राडा झाला. त्यामुळे दीदींच्या घराची सुरक्षेत वाढ करण्यात आली. आसनसोल, बाकुंडामध्ये राडा झाला. तृणमूलचे कार्यालय भाजपने पेटविल्याचा आरोप करण्यात आला. पोलिसांना लाठीमार करावा लागला. पश्चिम बंगालची निवडणूक अनेक कारणांनी गाजली. तृणमूलचे गुंडे असा उल्लेख भाजप नेते करत राहिले. एसआयआर, केंद्रीय दलांची तैनाती अशा अनेक बाबींबद्दल दीदींनी आक्षेप नोंदवले. मतमोजणी सुरू असताना मतमोजणी प्रतिनिधी, उमेदवारांनी मतमोजणी केंद्र सोडून जाऊ नये, भाजपचा डाव आहे, त्यांनी अनेक ठिकाणी मतमोजणी थांबवली आहे, कल्याणी मध्ये मशीन आकडेवारी जुळत नाही, केंद्रीय दलांच्या माध्यमातून तृणमूल वर अत्याचार केले जात आहेत, अखेर विजय आपला आहे असे सांगणारा ममता दीदींचा व्हिडीओ पुढे आला होता.

## मोदी-शहांनी कमळ फुलवले

**मुंबई, प्रतिनिधी**

देशाच्या पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम, पुदुचरी विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीची आज मतमोजणी झाली. त्यात भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगालमध्ये सत्तेत महापरिवर्तन ('महापोरिबोर्तोन') करत आसाम आणि पुदुचरीमध्येही यश मिळवत हॅट्रिक केली. काँग्रेस नेतृत्वाखालील आघाडी ने केरळ जिंकले. तमिळनाडूमध्ये सत्तांतरण होऊन अभिनेते विजय थलपती यांच्या पक्षाने विजयाच्या दिशेने वाटचाल केली.



## टीएमसी आणि डीएमके पराभूत

### गृहमंत्र्यांचे वाक्य चर्चेत

विधानसभा निवडणूक प्रचारावेळी अमित शहा यांनी दीदींना टाटा, गुड बाय असे वाक्य वापरले होते. त्याची मतमोजणीचा कल येत गेला तसे देशभर चर्चा झाली. आज कोलकोत्ता मध्ये ममतांची नक्कल भाजप कार्यकर्त्यांनी केली.

### शुभेंदु दोन्ही जागांवरून विजयी

विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला, पण विजयाचे प्रमाणपत्र दिले जात नाही. डायमंड हार्बर, मगरहाट पूर्व, मगरहाट पश्चिम, कुलपी, रायदीघी, पाथरप्रतिमा, बसंती, बर्धमान उत्तर आणि सुतई या जागांचा समावेश आहे, असा आरोप तृणमूलने केला आहे. दुसरीकडे नंदीग्राममधून भाजपचे शुभेंदु अधिकारी हे विजयी झालेत. त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवारांचा दहा हजारांहून अधिक मतांनी हरवले. दरम्यान, भबानीपूरमध्येही शुभेंदू मैदानात होते. त्यांच्या समोर ममतादीदी होत्या. दीदींनी संघर्ष केला खरे, पण त्यांना पराभवाचा धक्का बसला.

> **बंगालच्या जनतेला कोटी-कोटी प्रणाम. भीती आणि घुसखोरीला संरक्षण देणाऱ्यांना बंगाल च्या जनतेचे मतांमधून उत्तर आहे. गंगा आणि गंगासागर अशा प्रत्येक ठिकाणी भाजपचा भगवा झेंडा फडकत आहे, याचा गर्व आहे. तृणमूलच्या भीती संपविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रती दाखविण्यात आलेला विश्वास म्हणजे हे यश आहे.**
> **- अमित शहा (गृहमंत्री)**

**पक्षनिहाय मिळालेल्या जागा**
**भाजप : २०८**
**तृणमूल काँग्रेस : ७९**
**काँग्रेस : २**
**अन्य : ४**

## डॉ. हिमंतांचा 'करिष्मा'

### काँग्रेसचे गौरव गोगोई पराभूत

**गुवाहाटी (आसाम), वृत्तसंस्था**

विधानसभेच्या १२६ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा सरमा यांनी 'करिष्मा' दाखवला. भाजपचे तिसऱ्यांदा सरकार सत्तेत आले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई यांना पराभवाचा धक्का बसला आहे.



काँग्रेसचे नेते पवन खेडा यांनी मुख्यमंत्र्यांच्या संपत्तीबद्दल आरोपांच्या फैरी झाडल्या होत्या. त्यानंतर खेडांना अटक करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी जंगजंग पछाडले होते. सर्वोच्च न्यायालयाने खेडा यांना दिलासा दिला. मुख्यमंत्र्यांनी गोगोई यांना लक्ष्य केले होते. तसेच वादग्रस्त विधाने केल्याने विरोधकांनी मुख्यमंत्री यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठवली होती. या पार्श्वभूमीवर झालेली निवडणूक गाजली. जोहरटमधून गोगोई यांचा २३ हजार मतांनी पराभव झाला. इथून भाजपचे हितेंद्रनाथ गोस्वामी विजयी झाले.

डॉ. हिमंतांनी २००१ पासून विजय मिळवून देणाऱ्या जालुकबारी मधून आता परत विजय मिळवला. सुरवातीपासून भाजपने आघाडीची मुसंडी मारली. त्याचप्रमाणे भाजपने मागील निवडणुकीच्या तुलनेत ३० च्या आसपास अधिक जागा मिळवल्या आहेत. दरम्यान, दलगावमधून एआययूडीएफ चे मुनीबुर रहमान आणि बिन्नाकंडी मधून मोहम्मद बदरुद्दीन अजमल हे आघाडीवर होते.

**पक्षनिहाय मिळालेल्या जागा**
**भाजप : १०२**
**काँग्रेस :२१**
**अन्य : ३**

## थलपतींची विजयी 'शिट्टी'

### मुख्यमंत्री स्टॅलिन यांचा पराभव



**चेन्नई (तमिळनाडू),वृत्तसंस्था**

अभिनेते विजय थलपती यांच्या टीव्हीके या नव्या पक्षाने तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत विजयाची शिट्टी वाजवली आहे. धक्कादायक निकाल म्हणजे, मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचा विजय यांच्या पक्षाचे व्ही. एस. बाबू यांनी पराभव केला आहे.

दक्षिणमधील सुपरस्टार विजय यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह शिट्टी हे आहे. त्यांच्या तामिझगा वेत्री कझगम (टीव्हीके) बहुमताच्या दिशेने आघाडी घेतल्याचे स्पष्ट होताच, कुटुंबियांसह कार्यकर्त्यांनी शिट्टी वाजवत आनंदोत्सव सुरू केला. दरम्यान च्या काळात विजय यांच्या पराभवाची अफवा पसरल्याने महेंद्र या त्यांच्या चाहत्याने स्वतःचा गळा चिरला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

तमिळनाडू मध्ये स्टॅलिन यांच्या सत्ताधारी द्रविड मुनेत्र कलघम आणि विरोधी पक्ष अण्णा द्रविड मुनेत्र कलघम यांच्यात लढत मानली जात होती. मतदानानंतरच्या सर्वेक्षण मध्ये सत्ताधारी परत सत्तेत येतील असा अंदाज वर्तविण्यात आला होता. या निवडणुकीत काँग्रेसला मोठा फटका बसल्याचे दिसून आले. २०२१ मध्ये काँग्रेसला १८ जागा मिळाल्या होत्या. मतमोजणीच्या काही फेऱ्यांमध्ये काँग्रेसचे ५ उमेदवार आघाडीवर होते. याशिवाय मतमोजणीत सुरवातीला एडीएमके दुसऱ्या, तर डीएमके तिसऱ्या स्थानावर होता. पुढे डीएमके दुसऱ्या स्थानावर पोचला.

**पक्षनिहाय मिळालेल्या जागा**
**टीव्हीके +: १०८**
**डीएमके + : ७३**
**एडीएमके + : ५२**
**अन्य : १**

## एनडीए पुन्हा एकदा

**पुद्दुचेरी, दि. ४ वृत्तसंस्था**

केंद्रशासित प्रदेश असलेल्या पुडुचेरी विधानसभेत २०२१ मधील सत्ताधारी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए ने पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत मिळवले. ३० जागांपैकी बहुमताचा १६ जागांचा आकडा पार केला.



काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'इंडिया' ला चमकदार कामगिरी करता आली नाही. एनडीए मधील मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांच्या एआयएनआरसी पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. इंडिया मध्ये काँग्रेस आणि डीएमके चा समावेश आहे. मुख्यमंत्री रंगास्वामी यांनी थट्टनचावडी मतदारसंघातुन ४ हजार ४४१ मताधिक्याने विजय मिळवला. राजभवन विधानसभा मतदारसंघात डीएमकेचे विघ्नेश कन्नन यांनी विजय मिळवला. त्यांना ७ हजार ३०४ मते मिळाली. त्यांनी भाजपचे व्ही. पी. राम लिंगामे यांचा २८७ मतांनी पराभव केला.

**पक्ष निहाय मिळालेल्या जागा**
**भाजप नेतृत्वाखालील एनडीए :१८**
**काँग्रेस नेतृत्वाखालील इंडिया : ६**
**अन्य : ६**

## केरळममध्ये डाव्यांचा शेवटचा किल्ला कोसळला

### काँग्रेसच्या नेतृत्वाखाली यूडीएफची बल्ले बल्ले

**तिरुवनंतपूरम (केरळम),**

विधानसभेच्या १४० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत ७१ जागांचा बहुमताचा आकडा पार करत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने (यूडीएफ) बल्ले बल्ले केले. मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफ च्या रूपातील डाव्यांचा शेवटचा किल्ला कोसळला.

कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेस आलटून पालटून सत्तेत यायचे. २०२१ मध्ये माकप नेतृत्वाखालील एलडीएफने सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली. काँग्रेसचे दहा वर्षांनंतर सत्तेत पुनरागमन झाले. या विजयाने राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसला ताकद मिळाल्याचे मानले जात आहे. आसाम विधानसभा निवडणूक तोंडावर केरळम मध्ये पक्षात फुटतुट होऊ नये म्हणून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि खासदार प्रियंका गांधी यांनी विशेष लक्ष केंद्रीत केले होते. बहीण-भावाने केरळम ला प्राधान्य दिले होते. २०११ मध्ये पश्चिम बंगाल मध्ये कम्युनिस्टांचा पराभव झाल्यावर एलडीएफने डाव्यांच्या चळवळीला बळ दिले होते.

**काँग्रेस कार्यालयात जल्लोष**

विधानसभेतील बहुमताच्या पुढे आघाडी गेल्याचे स्पष्ट होताच, तिरुवनंतपूरम मधील काँग्रेस कार्यालयात जल्लोष करण्यात आला. के. सी. वेणूगोपाल आणि ज्येष्ठ नेते रमेश चेन्नईथला हे उपस्थित होते. खासदार शशी थरूर यांनाही आनंदभाव व्यक्त केला.

**पक्षनिहाय मिळालेल्या जागा**
**यूडीएफ : १००**
**एलडीएफ : ३५**
**एनडीए : ३**
**अन्य : २**



## बारामतीत सुनेत्रा पवारांनी अजितदादांचा रेकॉर्ड मोडला

## राहुरीत कर्डिलेंचा विजय





> बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते, असं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या. आजचा हा निकाल जाहीर होत असताना आदरणीय दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया, असंही सुनेत्रा पवारांनी सांगितलं.

**बारामती/ राहुरी, प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी विक्रमी कामगिरी करत माजी आमदार अजित पवार यांच्या २०१९ मधील मताधिक्याचे सर्व रेकॉर्ड मोडीत नवा रेकॉर्ड बनवला आहे. २४ च्या फेरीअखेर मिळालेल्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांचा विक्रमी विजय झाला आहे. सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. देशात सगळ्यात जास्त मताने निवडून येण्याचा विक्रम सुनेत्रा पवारांच्या नावाने आज झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, जय पवार आणि पार्थ पवार यांनी सुनेत्रा पवारांना विक्रमी मतांनी निवडणून देण्याचं आवाहन केले होते, त्याचबरोबर सर्व पक्षांनी आणि संघटनांनी देखील सुनेत्रा पवारांना पाठिंबा दिला होता, तर दुसरीकडे सुनेत्रा पवारांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या एकाही उमेदवाराला हजारापेक्षा जास्त मते देखील पडली नसल्याचं दिसून येत आहे. करूणा मुंडे यांना १२५ मते मिळाली आहेत, तर अभिजित बिचुकले यांना १२१ मते मिळाली आहेत.

बारामती पोट निवडणुकीतील सर्व मतमोजणी पुर्ण झाल्यानंतर सुनेत्रा पवारांना मिळालेले हे मताधिक्य आतापर्यंत देशातील सर्वाधिक मताधिक्य असल्याचा दावा करण्यात आला आहे. या आधी उत्तर प्रदेशमधील सुनील कुमार शर्मा हे २०२२ साली २ लाख १४ हजार ८३५ मताधिक्याने विजयी झाले होते. सुनेत्रा पवारांनी त्यांचा विक्रम मोडला आहे, असे सांगितले जात आहेत.

तर सुनेत्रा पवारांना मिळालेल्या विजयानंतर पार्थ पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला, यावेळी बोलताना पार्थ पवार म्हणाले की, आज रेकॉर्ड मताने निवडून आलो त्यांचे आभार. निवडणुकीला सामोरे जावे लागेल असे वाटले नव्हते. आम्हाला कुणालाही वाटत नाही आज आनंदाचा दिवस आहे. कुणीही जल्लोष करू नये. २०२९ची तयारी नाही. मी इथे लोकांसाठी असेल, जनता दरबार घेईल. आचारसंहिता संपल्यावर मी जनता दरबार घेईल, अशी माहिती देखील पार्थ पवारांनी दिली आहे.

बारामतीकरांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित आहे, असं सुनेत्रा अजित पवार यांनी म्हटलं आहे. तर बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानतानाच हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे. निर्धाराची, संघर्षाची आणि नव्या बारामतीची..! असं म्हणत सुनेत्रा अजित पवार यांनी बारामतीकरांना विकासाचा विश्वास दिला आहे.

### राहुरी विधानसभा अक्षय कर्डिले विजयी

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला असून, भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी एक लाखांहून अधिक मताधिक्क्याने ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. भाजपचे दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे या मतदारसंघाची पोटनिवडणूक घेण्यात आली होती.

सकाळी ८ वाजेपासून सुरू झालेल्या मतमोजणीत पहिल्या फेरीपासूनच अक्षय कर्डिले यांनी आघाडी घेतली होती, जी प्रत्येक फेरीगणिक वाढत गेली. २६ व्या फेरीअखेर कर्डिले यांनी १ लाखाचा टप्पा ओलांडून विरोधकांचा सुपडा साफ केला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना या निवडणुकीत मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे.

> विजयानंतर पत्रकारांशी बोलताना अक्षय कर्डिले भावूक झाले होते. ते म्हणाले की, "हा विजय म्हणजे शिवाजी कर्डिले साहेबांवर जनता किती प्रेम करते हे या मताच्या माध्यमातून दिसले आहे. साहेबांनी जसे शेवटच्या श्वासापर्यंत जनतेसाठी काम केले, तसाच माझा देखील शेवटचा श्वास हा जनतेच्या सेवेसाठीच राहील," अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## राहुल गांधींकडून तीन नेत्यांना फोन, अभिनेता विजयचं केलं अभिनंदन

**नवी दिल्ली**

पाच राज्यांच्या निवडणुकांपैकी इंडिया आघाडीला केवळ एका राज्यात यश मिळालं आहे. केरळमध्ये इंडिया आघाडीतील डाव्या पक्षांकडून सत्ता काँग्रेसप्रणित यूडीएफकडे आली आहे. मात्र, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडीतील पक्षांचा पराभव झाला आहे. अनुक्रमे तामिळनाडूत द्रमुकची सत्ता केली आहे. तर, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसची सत्ता गेली. आजच्या धक्कादायक निकालानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एम.के. स्टॅलिन आणि ममता बॅनर्जी यांच्यासोबत फोनवरुन चर्चा केली आहे. याशिवाय राहुल गांधी यांनी टीव्हीके पक्षाचे नेते थलपती विजय यांना फोन केला आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते जयराम रमेश यांनी या संदर्भातील माहिती दिली आहे.

राहुल गांधी यांनी ममता बॅनर्जी आणि एम.के. स्टॅलिन यांच्यासोबत निवडणुकीनंतर निर्माण झालेली स्थिती आणि विधानसभा निवडणूक निकालासंदर्भात चर्चा केली. एम.के. स्टॅलिन आणि ममता बॅनर्जी यांच्या पक्षाची कामगिरी निराशाजनक झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला भाजपकडून पराभव स्वीकारावा लागला. तर, तामिळनाडूत एम.के. स्टॅलिन यांच्या पक्षाला पहिल्यांदा निवडणूक लढवणाऱ्या थलपती विजय यांच्या टीव्हीकेकडून पराभव स्वीकारावा लागला आहे. द्रमुकसोबत आघाडी करत काँग्रेसनं निवडणूक लढवली होती.

# ...तोपर्यंत कुठल्याही राजकारण्याने माझ्या घरी येऊ नये

## पीडित मुलीच्या वडिलांची भावनिक भूमिका

**नसरापूर, प्रतिनिधी**

**भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षीय निष्पाप बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. महाराष्ट्र दिनाच्या दिवशीच घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण राज्यात संताप व्यक्त होत आहे. या घटनेनंतर पीडित मुलीच्या वडिलांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी म्हटले की, माझ्या मुलीला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आणि त्या नराधमाला फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय व्यक्तीने आमच्या घरी येऊ नये. या दरम्यानचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, पीडित कुटुंबाच्या या भूमिकेमुळे समाजात मोठी चर्चा सुरू झाली आहे. अनेक सामाजिक संघटना आणि नागरिकांनी कुटुंबाच्या भावनांना पाठिंबा दर्शवला आहे. नागरिकांकडून आरोपीस फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्याची मागणी होत आहे.**

उन्हाळ्याच्या सुटीसाठी आई-वडिलांसोबत आजोळी आलेल्या चिमुकलीला आरोपीने "वासरू दाखवतो" असे सांगत गोठ्याकडे नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करून हत्या करण्यात आली. इतकेच नव्हे तर पुरावे लपवण्यासाठी आरोपीने मृतदेह गोठ्यातील शेणात पुरल्याची धक्कादायक माहिती तपासातून समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी भीमराव कांबळे (वय ६५, रा. साळवडे, ता. भोर) याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. गावात शोककळा पसरली असून नागरिकांकडून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

## ठेचून मारा, अंत्यविधी झाला तरी मला कुणी सांगायला येऊ नका

### नसरापूर प्रकरणातील आरोपीची पत्नी काय काय म्हणाली

**पुणे, प्रतिनिधी**

पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणानंतर सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. आरोपीला कोर्टाने 5 दिवसांची कोठडी सुनावली आहे. मात्र, आरोपीने केलंलं हे पहिलं नाहीतर तिसरं कृत्य आहे. याआधी पुराने नसल्यानं तो 2 वेळा निर्दोष सुटला आहे. त्यामुळे किमान या प्रकरणात तरी त्याला कठोर शिक्षा व्हावी, अशी प्रतिक्रिया सर्वच स्तरातून उमटत आहेत.

नसरापूरमधील चिमुरडीवरील अत्याचार आणि निर्घृण हत्येच्या घटनेने राज्यभर संतापाची लाट उसळलेली असताना, या प्रकरणातील आरोपीच्या कुटुंबीयांनी माध्यमांसमोर येत तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. आरोपीचा मुलगा म्हणाला की, मला बाप म्हणून त्याला स्वीकारण्याची लाज वाटते. माझी एकच चूक आहे की मी त्याच्या पोटी जन्मलो. सरकारने त्याला लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी. त्याला ठेचून मारायला हवं. त्याने केलेला गुन्हा माफ करण्यासारखा नाही. त्या निष्पाप मुलीला न्याय मिळाला पाहिजे, पीडित मुलगी माझ्या भाची सारखी होती, असंही आरोपीच्या मुलाने सांगितले.

आरोपीला जिवंत जाळा...उभं जाळा...मला त्याचं तोंडही पाहायचं नाही. त्याचा अंत्यविधी झाला तरी मला कुणी सांगायला पण येऊ नका...फाशीची शिक्षा त्याच्यासाठी किरकोळ आहे, त्याला जिवंत जाळलं पाहिजे, असं आरोपीच्या पत्नी म्हणाल्या. मला अकरा नातवंडं आहेत. त्या निष्पाप बाळाच्या आत्म्याला काय वाटलं असेल? तिच्या आईच्या काळजाचा तुकडा गेला, तिला काय वाटत असेल याची मी कल्पना करू शकते. मी सुद्धा कुणाची तरी आईच आहे. घटना घडल्यापासून माझ्या घशाखाली अन्नाचा घास उतरलेला नाही, असंही आरोपीच्या पत्नी म्हणाल्या.

आरोपी पतीसोबत आमचा गेल्या 10 वर्षांपासून कोणताही संबंध नाही. मी आणि माझा मुलगा दोघेच एकत्र राहतो. या 10 वर्षांत आम्ही अनेकदा त्याला घरी बोलावण्याचा, नीट वागण्याचा प्रयत्न केला. पण तो नेहमी 'तुझं तू बघ' असं म्हणून आम्हाला झिडकारायचा, अशी प्रतिक्रियाही आरोपीच्या पत्नीने दिली.

सुट्टीसाठी आजीच्या घरी आलेली 4 वर्षांची चिमुकली अंगणात खेळत होती. त्यावेळी 1 मे रोजी 65 वर्षांच्या आरोपीने तिला गोठ्यात नेलं. तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. एवढंच नाहीतर तिला दगडाने ठेचून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेऊन पळ काढला. इतकं गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं.

## नराधमांना भर चौकात फाशी दिली पाहिजे; पण लोकशाही कायद्याने चालते

### मुख्यमंत्री फडणवीसांचे मोठे विधान

**नागपूर, दि. ३ प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथील चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणाऱ्या नराधमाला यमसदनी पाठवण्यासाठी राज्य सरकार कोणतीही कसर सोडणार नाही. अशा गुन्हेगारांना भर चौकात फाशी दिली पाहिजे, असे मलाही वाटते; मात्र लोकशाही कायद्याने चालते, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. नसरापूर प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा मिळवून देण्यासाठी सरकार 'रेकॉर्ड ब्रेक' वेगाने हा खटला चालवणार असल्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.



**खटला अत्यंत वेगाने चालवला जाईल**

मुख्यमंत्री म्हणाले की, "मी स्वतः पीडितेच्या वडिलांशी संवाद साधला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष आहे आणि तो रास्तच आहे. अशा नराधमांना कठोर शासन व्हावे हीच सरकारची भूमिका आहे. कोणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये किंवा तांत्रिक त्रुटीचा फायदा मिळू नये, या दृष्टीने सरकार भक्कमपणे न्यायालयात बाजू मांडेल. या प्रकरणाचा खटला अत्यंत वेगाने चालवला जाईल."

**पीडित कुटुंबाला सरकारचे लेखी आश्वासन**

पीडित कुटुंबाच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, या प्रकरणाचा तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासंदर्भात प्रशासनाच्या वतीने पीडित कुटुंबाला एक लेखी पत्रही देण्यात आले आहे.

घटनेच्या ठिकाणी काही लोक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न करत होते, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. ते म्हणाले, "काही लोक पीडितेच्या वडिलांनाही अडवण्याचा प्रयत्न करत होते, ते कोण आहेत हे आम्हाला समजले आहे. मात्र, मुलीच्या वडिलांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जी भूमिका घेतली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे," असे मुख्यमंत्री म्हणाले.

**जुना रेकॉर्ड तपासणार**

या प्रकरणातील आरोपीवर २०१९ मध्येही एक गुन्हा दाखल झाला होता, मात्र पुराव्याअभावी तो सुटला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, "त्यावेळी तपासात काही उणिवा राहिल्या होत्या का, याची चौकशी केली जाईल. तसेच त्याचे जुने गुन्हे शोधून काढून यावेळेस तो कोणत्याही परिस्थितीत सुटणार नाही, याची खबरदारी घेतली जात आहे."

**महिला आरक्षणावर राहुल गांधींना बोलण्याचा अधिकार नाही**

यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी राहुल गांधी यांच्यावरही कडाडून टीका केली. महिला आरक्षण विधेयकावर बोलण्याचा राहुल गांधींना कोणताही अधिकार नाही, असे फडणवीस म्हणाले. "भारतात पहिल्यांदा जेव्हा महिलांना लोकसभा आणि विधानसभेत संधी मिळत होती, तेव्हा काँग्रेसने आपल्या संख्याबळाच्या जोरावर त्याला विरोध केला. काँग्रेसने महिला आरक्षणाविरोधात नेहमीच प्रतिगामी निर्णय घेतले आहेत," असा टोलाही त्यांनी लगावला.

## दिल्लीत एसीच्या स्फोटात ९ जणांचा होरपळून मृत्यू




**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

दिल्लीतल्या विवेक विहारमध्ये एका इमारतीला आग लागली. या आगीत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तसंच अनेक लोक जखमीही झाले आहेत. आग इतकी भीषण होती की इमारतीत जे लोक झोपले होते त्यांना त्यांचा जीवही वाचवता आला नाही. कुणाचा मृतदेह बेडवर होता तर काही जणांचे मृतदेह जिन्यांवर मिळाले. इमारतीतल्या दुसऱ्या मजल्यावर एसीचा स्फोट झाल्यामुळे ही आग लागली असाही संशय व्यक्त होतो आहे.

तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबाने आपला जीव वाचवण्यासाठी गच्चीवर जाण्याचा निर्णय घेतला ते त्या दिशेने पळाले, पण गच्चीचा दरवाजा बंद होता. त्यामुळे ते तिथेच अडकले आणि आगीत होरपळून जिन्याच्या पायऱ्यांवरच त्यांचा मृत्यू ज्या ठिकाणी घटना घडली तिथेही चारजण उपस्थित होते त्यांचाही आगीत होरपळून मृत्यू झाला. जी आग लागली ती एसीमुळे लागली असं सांगितलं जातं आहे. अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, अग्निशमन नियंत्रण कक्षाला पहाटे ३:४७ च्या सुमारास सूचना मिळाली. त्यानंतर अग्निशमनदलाच्या १४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि इमारतीत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले. या घटनेत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर, ४ जण गंभीररित्या भाजले आहेत. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन अध्यक्षपदावर मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर अखेर केंद्रीय नागरी विमानवाहू राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पुण्याच्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्यानंतर हे पद काही काळ रिक्त होते.



गेल्या वर्षी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकांमध्ये मोठे राजकीय नाट्य पाहायला मिळाले होते. त्यावेळी अध्यक्षपदासाठी अजित पवार यांच्या विरोधात मुरलीधर मोहोळ यांनी शड्डू ठोकला होता. मात्र, ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार यांची अध्यक्षपदी तर मुरलीधर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी वर्णी लागली होती. आता अजित पवारांच्या निधनानंतर मोहोळ यांनी या संघटनेची धुरा आपल्या हाती घेतली आहे.

## महाराष्ट्राच्या तिजोरीला ३२ हजार कोटींची 'गळती' कॅगचा धक्कादायक अहवाल समोर

**मुंबई, प्रतिनिधी**

अलीकडेच महाराष्ट्राच्या प्रशासकीय तिजोरीबाबतचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. या अहवालानुसार महाराष्ट्रातील प्रशासकीय तिजोरीला ३२ हजार कोटींची गळती लागल्याचं समोर आले आहे. हा अहवाल कॅग रिपोर्ट्सकडून आला आहे, इतकेच नाही तर ही गळती नेमकी कशामुळे लागली हेदेखील समोर आले आहे. कॅग रिपोर्ट्सनुसार, राज्याच्या प्रशासकीय तिजोरीला अनेक वाहनांचा कर थकवणाऱ्यांमुळे मोठे नुकसान होत असल्याचे समोर आले आहे. याविषयी आरटीओला थेट सवाल करण्यात आला आहे की, हजारो वाहनांचा कर थकवणाऱ्यांवर आरटीओ मेहेरबान का? महत्त्वाची बाब म्हणजे गेल्या ५ वर्षांपासून १०,३५२ कोटींची थकबाकी प्रलंबित आहे.

## महिन्याभरात खाद्यतेलाच्या भावात १२ टक्क्यांनी वृद्धी

**नागपूर/मुंबई, प्रतिनिधी**

जागतिक पुरवठ्यातील अडथळे, बायोडिझेलसाठी पामतेलाचा वापर अशा कारणांनी महिन्याभरात खाद्यतेलाच्या भावात साधारणपणे १२ टक्क्यांनी वाढ झाली. त्यामुळे महागाईची फोडणी बसली. व्यापाऱ्यांना मिळालेल्या माहितीनुसार बायोडिझेलसाठी पामतेलाचा वापर ५० टक्क्यांहून अधिक होत आहे. देशात जवळपास ९० टक्के खाद्यतेलाची आयात होते. मलेशिया मधून पामतेल, अर्जेंटिना, ब्राझील मधून सोयाबीन, तर रशिया-युक्रेन मधून सूर्यफूल तेलाची आयात होती.



**खाद्यतेलाचे भाव**

**सूर्यफूल तेल :** १५५ रुपये किलो (साडेतेरा किलोचा डबा २ हजार ४१० रुपये)

**शेंगदाणा तेल :** १९१ रुपये लिटरचा पाऊच (पंधरा किलोचा डबा २ हजार ९५० रुपये)

**सोयाबीन तेल :** १५२ रुपये लिटर (पंधरा किलोचा डबा २ हजार ५२० रुपये)

**पामतेल :** १२० ते १४५ रुपये किलो.

## बापाकडूनच गतीमंद मुलीवर अत्याचार

**लातूर, प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून धक्कादायक आणि संतापजनक घटनांची मालिका सुरु आहे. नसरापूर आणि बीडनंतर आता लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातून अत्यंत अमानवी प्रकार उघडकीस आला आहे. बाल लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या पित्यानेच आपल्या अल्पवयीन गतिमंद मुलीवर वारंवार अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात पीडित मुलीच्या आईने १७ एप्रिल रोजी जळकोट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अज्ञात व्यक्तीकडून मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, पीडित मुलगी सुमारे १९ आठवडे २ दिवसांची गर्भवती असल्याचे समोर आले होते, त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले. तक्रारीनंतर जळकोट पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयाच्या आधारे मुलीच्या वडिलांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. पोलिसी चौकशीत संबंधित आरोपी वडिलांनीच हे कृत्य केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

## सैन्य मागे घ्या, नुकसान भरपाई द्या

### इराणचा अमेरिकेला नवा शांतता प्रस्ताव

**तेहरान, वृत्तसंस्था**

अमेरिका-इराणमधील युद्धाचा वणवा पुन्हा पेटणार की युद्ध संपणार? याबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे. कारण अमेरिका-इराणमधील युद्ध संपवण्याबाबत अजून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. पाकिस्तानच्या माध्यमातून शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. पण दुसऱ्या फेरीत देखील युद्धाबाबत ठोस तोडगा निघत नसल्याचं दिसून येत आहे. यातच अमेरिकेने काही दिवसांपासून होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी सुरू केलेली आहे. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे.



अशा परिस्थितीतही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळे वक्तव्य करत इराणला इशारा देत असल्याने हे युद्ध पुन्हा भडकणार का? याबाबत सवाल उपस्थित केले जात आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानच्या माध्यमातून इराणने हा प्रस्ताव दिला असून तात्पुरत्या युद्धविरामाऐवजी युद्ध पूर्णपणे संपवण्याची इच्छा व्यक्त केल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इराणमधील माध्यमांनी दिलं आहे.

इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याचं वृत्त इराणच्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे. वृत्तानुसार, इराणने अमेरिकेकडे अशी मागणी केली की, 'लेबनॉनसह सर्व युद्ध थांबवावं, नौदल नाकेबंदी हटवावी, संपूर्ण सैन्य मागे घ्यावं, इराणवरील सर्व निर्बंध हटवावेत, इराणची गोठवलेली मालमत्ता परत करावी, युद्धात झालेल्या नुकसानाची भरपाई द्यावी', अशा विविध १४ अटी इराणने अमेरिकेला दिलेल्या प्रस्तावात ठेवल्या आहेत.

दरम्यान, इराणने अमेरिकेच्या दोन महिन्यांच्या युद्धविरामाच्या योजनेला विरोध केला आहे. इराणचे उप परराष्ट्र मंत्री काझेम गरीबाबादी यांनी म्हटलं की,"वाटाघाटीतून तोडगा काढायचा की पुन्हा युद्धाकडे वळायचं हे अमेरिकेवर अवलंबून आहे. इराण दोन्हीसाठी तयार आहे."

आयआरआयबी(इराणची सरकारी रेडिओ आणि दूरदर्शन संस्था) च्या वृत्तानुसार, मंत्री काझेम गरीबाबादी यांनी म्हटलं की, "आता मुत्सद्देगिरीचा मार्ग निवडायचा की संघर्षात्मक भूमिका कायम ठेवायची? हे अमेरिकेच्या हातात आहे. आपलं राष्ट्रीय हित आणि सुरक्षा जपण्याच्या उद्देशाने इराण दोन्ही मार्गांसाठी तयार असेल."

## केरळ : काँग्रेसच्या नेत्यांमध्ये लॉबिंग सुरु

**तिरुवनंतपुरम, दि. ४ वृत्तसंस्था**

केरळ विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील UDF ने ऐतिहासिक मुसंडी मारली आहे. १४० जागांच्या विधानसभेत यूडीएफने १०० जागांचा टप्पा ओलांडला असून सत्ताधारी डाव्या आघाडीला मोठा धक्का बसला आहे. पिनरई विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफ केवळ ४१ जागांवर मर्यादित राहताना दिसत आहे.



यूडीएफच्या विजयानंतर आता केरळचा पुढचा मुख्यमंत्री कोण, यावर चर्चा सुरू झाली आहे. यामध्ये दोन प्रमुख नावे आघाडीवर आहेत. तिरुवनंतपुरममध्ये पोहोचलेल्या शशी थरूर यांनी मुख्यमंत्रीपदाच्या प्रश्नावर स्मितहास्य करत सूचक मौन पाळले आहे. "आमदारांशी चर्चा करून हायकमांड अंतिम निर्णय घेईल," असे त्यांनी स्पष्ट केले आहे. दिल्लीतील राजकारणात सक्रिय असलेले वेणुगोपाल यांच्या समर्थकांनी केरळच्या रस्त्यांवर मोठे कटआउट्स लावून जल्लोष सुरू केला आहे.

या दोघांव्यतिरिक्त व्ही.डी. सतीशन यांच्या नावावरही पक्षात खल सुरू आहे. नुकताच एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये थरूर आणि वेणुगोपाल एकमेकांना मिठी मारून शुभेच्छा देताना दिसत आहेत.

"मतमोजणी पूर्ण होण्यापूर्वीच काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी लॉबिंग आणि अंतर्गत गटबाजी सुरू झाली आहे," अशी टीका सीपीएमचे सरचिटणीस एम.ए. बेबी यांनी केली आहे. मुस्लिम लीग सारखे मित्रपक्षही आपल्या पसंतीचा मुख्यमंत्री लादण्याचा प्रयत्न करत असल्याचे संकेत मिळत आहेत.

केरळमध्ये दर ५ वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा २०१६ मध्ये खंडित झाली होती, जेव्हा पिनरई विजयन सलग दुसऱ्यांदा निवडून आले होते. मात्र, आता १० वर्षांनंतर काँग्रेसने पुन्हा मुसंडी मारत केरळचा गड सर केला आहे. २०१६ मध्ये ओमान चंडी यांच्या पराभवानंतर काँग्रेसला सत्तेची प्रतीक्षा होती, जी आता संपली आहे.

## आसनसोलमध्ये तृणमूलच्या कार्यालयात तोडफोड

### ममता बॅनर्जींच्या घराबाहेर 'जय श्री राम'च्या घोषणा

**आसनसोल, दि. ४ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत भाजपला मिळालेल्या मोठ्या आघाडीनंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आसनसोलमध्ये मतमोजणी केंद्राबाहेर तृणमूल काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोरदार चकमक झाली. परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली की, जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला.

पश्चिम बंगालमधील २९३ जागांच्या मतमोजणीत भाजपने ऐतिहासिक कामगिरी करत तृणमूल काँग्रेसचा सुपडा साफ केल्याचे चित्र आहे. सध्याच्या कलानुसार भाजप १९२ जागांवर तर तृणमूल काँग्रेस केवळ ९७ जागांवर आघाडीवर आहे. या निकालांमुळे बंगालच्या राजकारणात प्रचंड तणाव निर्माण झाला असून काही ठिकाणी हिंसक घटना घडल्या आहेत. कूचबिहारमध्ये भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये सशस्त्र चकमक झाल्याची माहिती समोर येत आहे. बांकुरा या भागातही दोन्ही पक्षांचे समर्थक आमनेसामने आले असून कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची आणि हाणामारी झाली आहे.

**ममता बॅनर्जींचा निवडणूक आयोगावर निशाणा**

सुरुवातीच्या कलानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. "निवडणूक आयोग मनमानी करत आहे, मात्र अंतिम फेरीनंतर आमचाच विजय होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे, कोलकात्यात ममता बॅनर्जी यांच्या 'कालीघाट' येथील निवासस्थानाबाहेर मोठ्या संख्येने जमलेल्या भाजप समर्थकांनी 'जय श्री राम'च्या घोषणा दिल्याने तणाव वाढला आहे.

मतमोजणी सुरू असतानाच आसनसोलमध्ये टीएमसी कार्यालयावर हल्ला करण्यात आला. आसनसोल इंजिनिअरिंग कॉलेजजवळील मोजणी केंद्राबाहेर दोन गटांत जोरदार चकमक झाली. यावेळी वाहनांची तोडफोड करण्यात आली असून, घटनास्थळी एक जिवंत बॉम्ब आढळल्याने खळबळ उडाली आहे. सुरक्षा यंत्रणांनी तात्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.

## बारावी निकाल मुहूर्ताचे गौडबंगाल

### 'नीट' परीक्षा आदल्या दिवसाची वेळ कुणाच्या पथ्यावर

**मुंबई, प्रतिनिधी**

'नीट' परीक्षा आज झाली. काल शनिवारी (दि.२) बारावीचा निकाल जाहीर झाला. मनासारखे गुण न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे काय झाले असेल? याचा कुणी विचार केला असेल काय? हा खरा प्रश्न आहे.

'नीट' परीक्षेच्या आदल्या दिवसाचा बारावीचा निकाल जाहीर करण्यासाठी शिक्षण मंडळाने साधलेला मुहूर्त कुणाच्या पथ्यावर पडला, असा प्रश्न राज्यभरातून उपस्थित करण्यात येत आहे. यासंबंधाने राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या कार्यालयात संपर्क साधला असता, त्यांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया झाले असल्याचे सांगण्यात आले. भुसे यांनी शिक्षणात काही प्रयोग सुरू केले आहेत. अशात, मराठी विद्यार्थ्यांचा विचार करण्याचा विसर नेमका कुणाला पडला? याचा शोध शासनाकडून घेतला जाणार काय? तसं न झाल्यास पुन्हा शिक्षण विभाग चर्चेत येण्याची शक्यता नाकारता



येत नाही.

'नीट' परीक्षेच्या आदल्या दिवशी बारावीचा निकाल का जाहीर केला ? याचं उत्तर प्रशासनातून मिळालं. शासन लवकर निकाल जाहीर करा असं सांगत असते. त्यानुसार निकाल जाहीर केला, असे ते उत्तर आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी बदल्यासह इतर मुद्यांवर संपाचे हत्यार उपसले होते. त्यामुळे निकालाला वेळ लागेल काय? अशी शंका उपस्थितीत करण्यात येत होती. मुळातच, सीईटी, नीट अशा परीक्षा मेच्या पहिल्या आठवड्यात मार्गी लागत असतात. त्यामुळे मे च्या दुसऱ्या आठवड्यात निकाल जाहीर करण्यात अडचण काय होती, असा पालकांचा प्रश्न आहे. दहावीचा निकाल अजून जाहीर व्हायचा असल्याने ते कारण पुढे केले जाण्याची शक्यता आहे.

आता आपण दुसरी बाजू पाहू यात. शिक्षण अभ्यासक किरण रायते म्हणाले, की दहावीच्या तुलनेत बारावी परीक्षेत अधिकचे गुण मिळवणं काहीसे कठीण होते. त्यामुळे कमी टक्के मिळाल्यावर, काही जणांच्या घरचे ओरडत राहिले आणि अशा वातावरणात दुसऱ्या दिवशी परीक्षेला सामोरे जावे लागले. दुसरीकडे चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांचा वेळ आनंदात गेला. 'नीट' परीक्षेची 'रिव्हिजन' साठीचा तेवढा वेळ कमी झाला.

शिक्षण अभ्यासक प्रमोद पाटील यांनीही मनासारखे गुण न मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या मानसिकता हा मुद्दा अधोरेखित केला. मानसशास्त्र तज्ज्ञ डॉ. उमेश नागपूरकर यांनी दुहेरी ताण याकडे लक्ष वेधत मनोबलाचा विचार व्हायला हवा, असा सल्ला दिलाय.

**ढासळत चाललेला निकाल**

शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२५ ची तुलना करत यंदा बारावीचा २.०९ टक्के कमी निकाल लागला, असे ठळकपणे नमूद केले. मात्र २०२४ नंतर ढासळत चाललेल्या निकालाबद्दल अवाक्षर बोलायला कुणीही तयार नाही. विज्ञान, कला, वाणिज्य, व्यवसाय अभ्यासक्रम, आयटी या शाखांच्या नियमित विद्यार्थ्यांचा २०२३ मध्ये राज्याचा निकाल ९२.२५ टक्के लागला. २०२४ मध्ये ९३.३७ टक्क्यांवर निकाल झेपावला. गेल्यावर्षी ९१.८८ टक्क्यांपर्यंत निकाल घसरला. यंदाही घसरण कायम राहिली आणि ८९.७९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

## होर्मुझच्या विळख्यातून भारताचे 'सर्व शक्ति' सुखरुप बाहेर

**नवी दिल्ली, दि. ४वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावादरम्यान भारतासाठी एक आनंदाची बातमी आहे. भारताचे सर्व शक्ति एलपीजी टँकर होर्मुझच्या विळख्यातून सुरक्षित बाहेर पडले आहे. हे जहाज आता भारताच्या दिशेने कूच करत असून देशातील गॅस टंचाईला मोठा दिलासा मिळाला आहे. या जहाजावर सुमारे ४५ हजार टन एलपीजीचा साठा आहे.



गेल्या दोन महिन्याभरापासून अमेरिका इराण संघर्ष सुरु आहे. दोन्ही देशांत सध्या युद्धबंदी लागू असली तर होर्मुझमध्ये एकेमकांवर विळखा कायम आहे. यामुळे जगभरातील अनेक देशांची जहाज समुद्रात अडकून पडली आहे. अशा परिस्थितीत भारताच्या सर्व शक्ति जहाजाने ४५ हजार टन एलपीजी सह सुखरुप मार्ग काढला आहे. इराणच्या लारक आणि केशम बेटाजवळून हे जहाज सुरक्षित बाहेर पडले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या जहाजाने इराणच्या सर्व सागरी अटींचे काटेकोर पालन केले आहे. या जहाजावर एकूण १८ भारतीय नाविक होते. यामुळे याची ओळख उघड करण्यात आली होती. ज्यामुळे प्रवासात नाविकांना कोणताही अडथला येणार नाही.

सध्या भारत मोठ्या प्रमाणावर उर्जा संकटाचा सामना करत आहे. मध्यपूर्वेकडील उर्जा साखळी विस्कळीत झाल्यामुळे देशात एलपीजी चा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे सिलेंडरसाठी लोकांच्या रांगा लागल्या आहे. मात्र सर्व शक्ति च्या होर्मुझमधून सुखरुप बाहेर पडल्याने भारताला मोठा दिला मिळाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे जहाज विशाखापट्टणमच्या एलपीजी टर्मिनलवर उतरणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या होर्मुझमध्ये १४ ते १६ जहाजे अडकली असून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु आहे.

## सोलापूरमध्ये बसचा अपघात; दोघे जागीच ठार

**सोलापूर, प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या भीषण अपघातात पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. त्यानंतर, आता सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट-गाणगापूर महामार्गावर बस आणि डंपरचा भीषण अपघात झाला. त्यामध्ये, दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. दिवसभरातील या दोन वेगवेगळ्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. जामनेर येथील अपघाताच्या घटनेत सुदैवाने एक वर्षाची चिमुकली बचावली. अक्कलकोट तालुक्यातील रुद्देवाडी गावाजवळ हा भीषण अपघात झाला. अक्कलकोटहून गाणगापूरकडे जाणाऱ्या बसला मुरूमने भरलेल्या टँकरने जोरदार धडक दिली. या अपघातात अक्कलकोट तालुक्यातील चंद्रभागा लाडप्पा हडपद आणि धाराशिव जिल्ह्यातील चांगदेव श्रीरंग लवटे या दोघांचा मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता मी एसटी बसला धडक दिल्यानंतर डंपरने अक्षरशः पेट घेतला. या धडकेत एसटी बसच्या पुढच्या बाजूचं मोठं नुकसान, काही प्रवासी गंभीर जखमी तर काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याची माहिती आहे.

# आता एक कोटी लखपती दीदीचे लक्ष्य

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई, प्रतिनिधी**

देशाच्या विकासाच्या वाटचालीत नारीशक्तीचे योगदान महत्त्वाचे असून ही नारीशक्ती ज्यावेळी संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल, तेव्हाच भारत पूर्णपणे विकसित होईल, अशा शब्दात नारी शक्तीचा सन्मान करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी देशात सर्वात पहिले एक कोटी लखपती दीदी महाराष्ट्रातच झाल्या पाहिजे, असे आवाहन केले. महिला बचत गटासाठी असलेल्या उमेद मॉलचे जाळे तालुका स्तरापर्यंत विस्तारित करायचे आहे, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स संकुलातील एमएमआरडीए मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना फडणवीस यांनी महिला बचत गटाच्या कामाचे कौतुक केले. महिला बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी २० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉलचे काम सुरू करण्यात आले आहे. उर्वरित १६ जिल्ह्यांमध्ये मॉलचे काम सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारीशक्तीच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत. त्याचा लाभ महिलांना होत आहे. राज्यात ५० लक्ष लखपती दीदी तयार होत आहेत. महिलांशी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणा 'पावर हाऊस' आहे. या महिला शक्तीच्या योगदानातून शासनाने सुरू केलेली ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वी करायची आहे. उमेदच्या माध्यमातून यासाठी एक योजना तयार करण्यात यावी. या योजनेच्या माध्यमातून महिला बचत गटांना नर्सरी तयार करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. नर्सरी तयार करण्यापासून झाडे लावणे आणि त्याची निगा राखणे यासाठी पण खर्च शासन स्तरावरून देण्यात येईल. अशा महिला बचत गटांना वृक्ष लागवडीतून व्यावसायिक स्वरूपात मिळकत देखील होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महालक्ष्मी सरस प्रदर्शन महिला बचत गटांच्या उत्पादनासाठी हक्काची बाजारपेठ आहे. सर्वसाधारण महिलांपासून ते अन्न तंत्रज्ञानात शिक्षण घेतलेल्या महिलांपर्यंत महिला बचत गटांच्या माध्यमातून उत्पादित उत्पादने महालक्ष्मी सरस प्रदर्शनामध्ये उपलब्ध असतात. व्यावसायिक स्वरूपामध्ये पॅकेजिंग केलेल्या वस्तू या प्रदर्शनामध्ये पाहायला मिळतात. यावरून कुठल्याही स्पर्धेसाठी महिला बचतगट आता सज्ज असल्याचे दिसत आहे. देशात ई-कॉमर्स मोठ्या वेगाने वाढत आहे. उमेद मार्ट या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर एक हजार पेक्षा जास्त वस्तू आहेत. राज्यातील नागरिकांनी उमेद मार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरूनच खरेदी करावी, असे आवाहनही फडणवीस यांनी यावेळी केले.

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, कौशल्य विकास, उद्योजकता आणि रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर आदी उपस्थित होते.

# हाउसिंग स्टॉकमधील घरांच्या वापरासाठी धोरण तयार करा!

## मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत बैठक

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांसाठी घरांची व्यवस्था करण्यात येते. अशा उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या 'हाउसिंग स्टॉक'मधील घरांचा अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध वापर करण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करावे, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी संबंधित यंत्रणांना दिले.

मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत आज मुख्यमंत्र्यांच्या ' वर्षा' या शासकीय निवासस्थानी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात सध्या विविध विकास प्रकल्प सुरू असून भविष्यात अनेक महत्त्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प प्रस्तावित आहेत. या प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनींच्या उपलब्धतेसाठी केंद्र सरकारच्या यंत्रणांशी समन्वय साधून संयुक्त सर्वेक्षण करावे. तसेच विकासकामांसाठी लागणाऱ्या जमिनींबाबत केंद्राशी संबंधित सर्व प्रस्ताव एकत्रितपणे पाठविण्याचे निर्देश त्यांनी दिले. एमएमआरडीएच्या अखत्यारीतील न्यायप्रविष्ट प्रकरणे जलद निकाली निघण्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी उत्तर मुंबईत राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात आलेले शिंपोली कौशल्य विकास केंद्र लवकर कार्यान्वित करण्याची मागणी केली. कांदिवलीत पीपीपी तत्त्वावर क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्याबरोबरच स्थानिक मैदानांवर अधिक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी सांगितले. तसेच 'ड्रग फ्री इंडिया' मोहिमेत पोलीस प्रशासनाने सक्रिय सहभाग नोंदवावा. मत्स्यसंपदा योजनेंतर्गत किनारी गावांचा विकास करावा आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील नागरिकांसाठी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी, अशा सूचनाही गोयल यांनी केल्या.

या बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू, एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचना...**

- मुंबईतील शताब्दी आणि भगवती रुग्णालयांमध्ये आधुनिक यंत्रसामग्री, स्वच्छता आणि मनुष्यबळ उपलब्धतेवर भर द्यावा
- मुंबईतील गावठाणांचे रेखांकन तातडीने पूर्ण करावे. रेखांकनानंतर गावठाणातील शेवटच्या नागरिकाला नागरी सुविधा मिळतील याची खात्री करावी
- गोराई भागात दिल्ली येथील भारत मंडपम च्या धर्तीवर ' कन्व्हेंशन सेंटर' निर्माण करण्यासाठी कार्यवाही करावी. यासाठी बृहत नियोजन आराखडा बनवावा. या केंद्राचा उपयोग व्यावसायिक स्तरावर होईल, अशा पद्धतीचे नियोजन करावे
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र विस्तारासाठी जमिनीच्या उपलब्धतेचा पाठपुरावा करा
- दिघी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना गती द्या

# परभणीच्या खासदाराच्या त्या एका विधानाने मातोश्रीची धाकधूक वाढली!

**मुंबई, प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातील अंतर्गत खदखद आता उघडपणे समोर येऊ लागली असून, परभणीचे खासदार संजय जाधव यांनी केलेल्या एका धक्कादायक विधानाने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजवून दिली आहे. "मी आज तुमच्यासोबत आहे, पण उद्याचे सांगता येणार नाही," अशा शब्दांत त्यांनी भविष्यातील बदलांचे संकेत दिल्याने ठाकरे गटात पुन्हा एकदा मोठ्या भूकंपाची शक्यता वर्तवली जात आहे.

परभणी येथील एका खासगी रुग्णालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात खासदार जाधव बोलत होते. यावेळी त्यांनी व्यक्त केलेली हतबलता आणि सूचक वक्तव्ये चर्चेचा विषय ठरली आहेत. पक्षनिष्ठेबद्दल बोलताना ते म्हणाले की, ज्या पक्षाने मला मोठे केले, त्याबद्दल आजही मला आदर आहे आणि ज्यांनी संधी दिली त्यांच्याशी प्रतारणा करण्याची माझी मानसिकता नाही. मात्र, त्याच वेळी "बदलत्या परिस्थितीत उद्या काय होईल, हे आज ठामपणे सांगू शकत नाही," असे सांगत त्यांनी आपल्या संभाव्य राजकीय प्रवासाबाबतचा सस्पेन्स अधिक गडद केला आहे.

यावेळी जाधव यांनी सध्याच्या राजकारणातील 'अर्थकारणावर' जोरदार प्रहार केला. राजकारण आता समाजकारणाऐवजी केवळ पैशांच्या जोरावर चालत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, "आज मतदारांनाही 'नगदी'मध्ये रस वाटू लागला आहे. अगदी प्रतिष्ठित घरातील लोकही मतदानाच्या दिवशी मतांच्या बदल्यात पैशांची अपेक्षा व्यक्त करतात, हा अनुभव अत्यंत क्लेशदायक आहे."

आपल्या भाषणात "नियत में खतरा तो झोली में पथरा" अशा म्हणीचा वापर करत त्यांनी सध्याच्या अस्थिर वातावरणावर भाष्य केले. "योग्य वेळ येईल तेव्हा आम्ही निर्णय घेऊ," असे म्हणत त्यांनी शिंदे गटात जाण्याच्या चर्चांना पूर्णपणे पूर्णविराम न देता उलट वावच दिला आहे. परभणीत उद्धव ठाकरेंचे कट्टर समर्थक मानले जाणारे संजय जाधव जर बाजूला झाले, तर मराठवाड्यात ठाकरे गटाला हा आजवरचा सर्वात मोठा धक्का ठरू शकतो. आता आगामी काळात जाधव आपली 'नियत' कोणत्या बाजूला वळवतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# बिनविरोध निवडीची आज घोषणा

**मुंबई, प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत शनिवारी भाजपच्या पाच, शिवसेना शिंदे गटाच्या दोन तर राष्ट्रवादी अजित पवार गट आणि ठाकरे गटाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा निवडणूक अर्ज वैध ठरला. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली असून विजयी उमेदवारांची घोषणा सोमवार, ३ मे रोजी करण्यात येणार आहे. विधान परिषद निवडणुकीच्या ९ जागांसाठी एकूण १७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. राजकीय पक्षांच्या चार उमेदवारांनी प्रत्येकी दोन अर्ज भरले होते. याशिवाय चार जणांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले होते. या उमेदवारी अर्जाची आज छाननी झाली. छाननीत राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. तर चार अपक्ष उमेदवारांचे अर्जसूचक आणि अनुमोदक नसल्याने अवैध ठरले.

# काँग्रेसचा बुलंद आवाज कायमचा शांत!




**मुंबई, प्रतिनिधी**

राजकारणात सत्तेच्या लाटेसोबत दिशा बदलणाऱ्यांच्या गर्दीत, अखेरच्या श्वासापर्यंत एकाच विचाराशी प्रामाणिक राहिलेला एक कर्मठ योद्धा गेला. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे अत्यंत विश्वासू आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी यशवंत हाप्पे यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी दादर येथील 'टिळक भवन' मध्ये नुकतीच एक भावपूर्ण शोकसभा पार पडली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह अभय छाजेड, माजी आमदार वजाहत मिर्झा, ॲड. गणेश पाटील, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि अतुल लोंढे यांसारख्या दिग्गज नेत्यांनी हाप्पे यांना आदरांजली वाहिली.

यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी हाप्पे यांच्या निष्ठेचा गौरव केला. ते म्हणाले की, "यशवंत हाप्पे हे वसंतदादा पाटील नावाच्या हिमालयाच्या सावलीत वाढले, पण त्यांनी स्वतःचे एक वेगळे वलय निर्माण केले होते. सत्तेत असो वा नसो, त्यांनी काँग्रेसची विचारधारा कधीही सोडली नाही. अहंकार नसलेला आणि सर्वस्व अर्पण करणारा असा कार्यकर्ता आजच्या काळात मिळणे दुर्मिळ आहे."

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी हाप्पे यांच्या मैत्रीचे आणि निष्ठेचे काही अज्ञात पैलू उलगडले. ते म्हणाले की, "यशवंत हाप्पे यांचे नाते केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांच्याशी त्यांचा घनिष्ठ स्नेह होता. पंढरपूरची वारी असो किंवा मध्य प्रदेशातील निवडणुका, हाप्पे हे नेहमीच सावलीप्रमाणे त्यांच्यासोबत असत. दादांच्या निधनानंतरही त्यांनी तोच सन्मान आणि निष्ठा टिकवून ठेवली."

या शोकसभेला खजिनदार अभय छाजेड आणि नंदाताई म्हात्रे यांनीही संबोधित केले. यशवंत हाप्पे यांचा वारसा त्यांचे चिरंजीव विश्वजित हाप्पे पुढे चालवत असून, संपूर्ण काँग्रेस परिवाराने यावेळी हाप्पे कुटुंबियांच्या दुःखात सहभाग नोंदवला. एक व्रतस्थ कार्यकर्त्याचा प्रवास आज थांबला असला, तरी त्यांच्या निष्ठेचा आदर्श कार्यकर्त्यांसाठी कायम मार्गदर्शक ठरेल, असा सूर या प्रसंगी उमटला.

# शिंदेंचा 'सर्जिकल स्ट्राईक' ? महापालिका आणि जिल्हा परिषद निकालांनंतर मंत्र्यांचे धाबे दणाणले!

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेच्या बहुप्रतीक्षित निवडणुका पार पडल्यानंतर आणि राज्यातील विविध जिल्हा परिषदांसह पंचायत समित्यांचे निकाल समोर आल्यावर, आता शिवसेना शिंदे गटात मोठ्या फेरबदलांची चिन्हे दिसत आहेत. या निवडणुकांमध्ये सत्तेत असूनही काही ठिकाणी पक्षाला बसलेला फटका आणि भाजपाने मारलेली मुसंडी पाहता, उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आता अत्यंत कठोर भूमिकेत आले आहेत. निवडणुकीतील कामगिरी हाच मुख्य निकष मानून शिंदे आता आपल्या मंत्रिमंडळाचे 'ऑपरेशन क्लिनअप' करण्याच्या तयारीत आहेत.

निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर शिंदेंनी प्रत्येक मंत्र्याच्या आणि जिल्हा प्रमुखाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. ज्या मंत्र्यांच्या प्रभावाखालील भागात पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला किंवा ज्यांनी केवळ स्वतःचे पद टिकवण्यासाठी वेळ घालवला, अशा नेत्यांचे 'रिपोर्ट कार्ड' आता तपासले जात आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निकालांनी ग्रामीण भागातील खरी परिस्थिती समोर आणली असून, जे मंत्री स्थानिक राजकारणात पक्षाचे वजन वाढवण्यात कमी पडले आहेत, त्यांना आता मंत्रिमंडळातून डच्चू मिळण्याची दाट शक्यता आहे.

या राजकीय समीकरणात सर्वात महत्त्वाची ठरणार आहे ती म्हणजे 'आक्रमक चेहऱ्यांची एन्ट्री'. विधान परिषदेनंतर आता बच्चू कडू यांना मंत्रिमंडळात सामावून घेण्याच्या हालचालींना वेग आला आहे. कडू यांच्यासारखा जनसंपर्क असलेला आणि प्रशासनावर वचक ठेवणारा नेता मंत्रिमंडळात आणून, विदर्भासह राज्यभरात पक्ष संघटना बळकट करण्याचा शिंदेंचा मानस आहे. मात्र, बच्चू कडू किंवा इतर नवीन चेहऱ्यांसाठी जागा करताना, गेल्या दोन वर्षात 'कोरी गुणपत्रिका' असलेल्या जुन्या मंत्र्यांचा पत्ता कट केला जाणार असल्याचे समजते.

मुंबई महापालिकेत अपेक्षेप्रमाणे यश न मिळाल्याने मुंबईतील काही नेत्यांवर शिंदे नाराज असल्याचे बोलले जात आहे. धाराशिव, परभणी आणि संभाजीनगरमधील पक्षांतर्गत गटबाजी मोडीत काढण्यासाठी देखील हे 'धक्कातंत्र' वापरले जाणार आहे. वाचाळवीर नेते, निष्क्रिय पदाधिकारी आणि जनतेच्या प्रश्नांपासून लांब गेलेल्या मंत्र्यांना बाजूला करून, शिंदे आता पूर्णपणे नवीन आणि रिझल्ट देणारी टीम तयार करत आहेत. मुख्यमंत्री पदाचा अनुभव आणि सध्या उपमुख्यमंत्री म्हणून असलेली ताकद वापरून एकनाथ शिंदे हा राजकीय 'सर्जिकल स्ट्राईक' कधी घडवून आणतात, याकडे आता सत्ताधाऱ्यांसह विरोधकांचेही लक्ष लागले आहे.

# जास्त स्क्रीन टाईममुळे लहान मुलांना ऑटिझमचा धोका

**मुंबई, प्रतिनिधी**

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि स्क्रीन मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. मात्र, हाच स्क्रीन टाईम लहान मुलांमधील ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर वाढण्यास कारणीभूत ठरत असल्याचे समोर आले आहे. दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या बालरोग न्यूरोलॉजी विभागाच्या प्रमुख डॉ. शेफाली गुलाटी यांनी यासंदर्भात महत्त्वाची माहिती दिली आहे.

डॉ. गुलाटी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या संशोधनात असे दिसून आले की, ज्या मुलांचा वयाच्या पहिल्या वर्षी स्क्रीनशी जास्त संबंध आला, त्यांच्यामध्ये वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत ऑटिझमची लक्षणे दिसण्याचे प्रमाण अधिक आहे. 'ज्या मुलांना ऑटिझमचे निदान झाले आहे, अशा मुलांचा स्क्रीनशी संपर्क लवकर आणि दीर्घकाळासाठी आल्याचे प्रकर्षाने जाणवले,' असे त्यांनी नमूद केले.

बाळाच्या मेंदूच्या विकासासाठी स्क्रीनपेक्षा मानवी संवाद अत्यंत गरजेचा असतो. बाळाने आई-वडिलांचे चेहरे पाहणे, त्यांचा आवाज ऐकणे आणि त्यांच्या प्रतिक्रिया समजून घेणे यातूनच ते सामाजिक कौशल्ये शिकत असतात. फोनमुळे हा नैसर्गिक संवाद खंडित होतो, ज्यामुळे मुलांच्या भाषेवर आणि सामाजिक आकलनावर परिणाम होतो.

**ऑटिझमची लक्षणे आणि उपाय**

ऑटिझम ही एक विकासविषयक स्थिती असून, यात मुलांना नजर मिळवणे, हाक मारल्यावर प्रतिसाद देणे किंवा सामाजिक संकेत समजून घेणे कठीण जाते. मुले एकच कृती वारंवार करणे किंवा बोलण्यात मागे पडणे, अशी लक्षणे दिसू शकतात.

# भाजप नगरसेवकांच्या तिजोरीला टाळे लागणार ?

## मुंबई अध्यक्षांच्या एका इशाऱ्याने महापालिकेत मोठी खळबळ!

**मुंबई, प्रतिनिधी**



सत्ता आणि जनतेचा विश्वास जर गांभीर्याने घेणार नसाल, तर परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा, असा थेट इशारा आता भाजपच्या गोटातून देण्यात आला आहे. महापालिकेतील कामकाजाबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या आणि सभागृहात दांड्या मारणाऱ्या नगरसेवकांचे धाबे आता चांगलेच दणाणले आहेत. "पक्षशिस्त पाळणार नसाल तर विकासनिधी देताना विचार केला जाईल," अशा सज्जड शब्दांत मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी आपल्याच नगरसेवकांना सुनावले असून, या प्रकरणाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

महापालिकेच्या महत्त्वाच्या प्रस्तावावेळी नगरसेवक अनुपस्थित राहणे ही अतिशय गंभीर बाब असल्याचे अमित साटम यांनी स्पष्ट केले आहे. मुंबईकरांनी मोठ्या अपेक्षेने आपल्याला निवडून दिले आहे, मात्र त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात नगरसेवक कमी पडत असल्याचा संताप साटम यांनी व्यक्त केला. नुकत्याच पार पडलेल्या एका ऑनलाइन बैठकीत त्यांनी नगरसेवकांचा अक्षरशः 'क्लास' घेतला. यापुढे सभागृहाच्या कामकाजात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही आणि ज्यांनी पक्षाचा 'व्हीप' पाळला नाही, त्यांना सोडले जाणार नाही, असा सज्जड दमच त्यांनी दिला आहे.

दुसरीकडे, महापौर रितू तावडे यांनीही या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेतली आहे. ज्या नगरसेवकांनी सभागृहात दांडी मारली, त्यांना पक्षाकडून 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून, त्यांच्याकडून लेखी उत्तर मागवण्यात आले आहे. विरोधकांना उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, एखादा प्रस्ताव नामंजूर झाल्याने विरोधकांनी हुरळून जाऊ नये, अजून बरेच काही बाकी आहे. केवळ बैठकांपर्यंत मर्यादित न राहता आता सत्ताधारी नगरसेवकांना थेट 'ग्राऊंड'वर उतरून काम करावे लागणार आहे.

याच मोहिमेचा भाग म्हणून मुंबईतील नालेसफाईच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी महापौरांनी आजपासून सुरू केली. माहुल नाल्याच्या पाहणीदरम्यान कंत्राटदारांचा बेजबाबदारपणा समोर आल्यानंतर महापौरांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले. कामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही नसणे आणि कामात दिरंगाई करणे यावरून त्यांनी कडक आदेश दिले आहेत. आता नालेसफाईच्या कामाचे प्रत्येक ३० सेकंदाचे व्हिडिओ काढणे आणि सीसीटीव्हीची थेट लिंक स्थानिक नगरसेवकांना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुंबई भाजपच्या या अंतर्गत 'सर्जरी'मुळे आता निष्क्रिय नगरसेवकांचे धाबे दणाणले असून, विकासनिधी वाचवण्यासाठी तरी त्यांना आता कामाला लागावे लागणार असल्याचे दिसत आहे.

# नामांकित महाविद्यालयांच्या एफवाय कट ऑफवर परिणाम होण्याची शक्यता

**मुंबई, प्रतिनिधी**



मुंबई विभागाच्या बारावी निकालात यंदा दुहेरी घसरण नोंदवली गेली असून त्याचा थेट परिणाम आता 'मिशन ॲडमिशन' वर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एकीकडे निकालाची टक्केवारी कमी झाली, तर दुसरीकडे ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. परिणामी, मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील एफवाय (प्रथम वर्ष) प्रवेश प्रक्रियेतील कटऑफवर होण्याची शक्यता आहे.

यंदा मुंबई विभागाचा निकाल ९०.०८ टक्के इतका लागला असून, तो मागील वर्षीच्या ९२.९३ टक्क्यांच्या तुलनेत २.८५ टक्क्यांनी घसरला आहे. विशेष म्हणजे, परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढूनही हा निकाल घसरला आहे. यावर्षी ३ लाख २३ हजार ५०१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले, जे मागील वर्षीपेक्षा सुमारे ९ हजारांनी अधिक आहेत. मात्र या वाढीचा सकारात्मक परिणाम निकालात दिसला नाही.

**३,४५२ गुणवंत घटले**

७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या वर्षी ४२ हजार ४८१ इतकी होती, ती यंदा ३९ हजार २९ वर आली आहे. म्हणजेच तब्बल ३ हजार ४५२ गुणवंत कमी झाले आहेत. याचा थेट परिणाम एफवाय प्रवेशावर होणार असल्याचे महाविद्यालयीन प्राचार्यांचे मत आहे.

प्रथम श्रेणीतील (६० टक्क्यांहून अधिक) विद्यार्थ्यांची संख्याही २ हजार ७१६ ने घटली आहे. यावरून केवळ टॉपर्सच नव्हे, तर एकूणच उच्च गुणवत्तेचा स्तर या निकालात कमी झालेला दिसत आहे. दुसरीकडे, केवळ उत्तीर्ण (३५ टक्के) श्रेणीत मात्र ५ हजार ६०७विद्यार्थ्यांची वाढ झाली आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

# प्लॅटफॉर्म दुर्घटनेची व्हीजेआयटी तज्ज्ञांकडून चौकशी

**मुंबई, प्रतिनिधी**

दहिसर-भाईंदर जोड मार्ग (डीबीएलआर) कास्टिंग यार्ड येथील प्लॅटफॉर्म दुर्घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यासाठी 'व्हीजेआयटी'च्या प्राध्यापकांच्या तज्ज्ञ चमूची नियुक्ती करण्यात आली आहे. हे चमू तातडीने चौकशी करून वस्तुनिष्ठ व तथ्याधारित अहवाल सादर करणार आहे. अहवालातील निष्कर्षांच्या आधारे संबंधित कंत्राटदारांविरुद्ध कठोर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. कामगार सुरक्षिततेतील कोणत्याही त्रुटींची ओळख पटवून त्या दूर करण्यासाठी ठोस शिफारसी सादर करण्याची विनंती 'व्हीजेआयटी' टीमला करण्यात आली आहे, अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली. कोणताही मुंबईतील विकासकामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून कामगारांच्या सुरक्षिततेबाबत हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. कामगार सुरक्षेस सर्वोच्च प्राधान्य असून कामगारांच्या सुरक्षिततेबाबत महानगरपालिका प्रशासनाचे शून्य सहिष्णुतेचे धोरण कायम आहे. सर्व उंच आधार संरचना (गॅन्ट्री), क्रेन्स व इतर यंत्रसामग्रीची तृतीय पक्षामार्फत सखोल व पुनः सुरक्षा तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे तसेच सुरक्षा लेखापरीक्षण काटेकोरपणे राबवण्यात येत आहे, असेही स्पष्ट केले.

# 'टीबी मुक्त भारत' अभियान झोपडपट्ट्यांपर्यंत नेण्याचा राज्यपालांचा संकल्प

**मुंबई, प्रतिनिधी**

'टीबी मुक्त भारत अभियान' मुंबईतील प्रत्येक झोपडपट्टीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुक्रवारी लोकभवन, मुंबई येथे व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त लोकभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांनी 'टीबी मुक्त भारत – लोकभवन महाराष्ट्र उपक्रम' या विषयावरील पोस्टरचे अनावरण केले. उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या देशातून क्षयरोग निर्मूलनाच्या आवाहनाशी सुसंगत असल्याचे सांगितले. मुंबईतील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्ट्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# प्रदीर्घ काळानंतर पुन्हा कामावर घेणे अशक्य

## उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

**मुंबई, प्रतिनिधी**

१० वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर कामाचे स्वरूप, तंत्रज्ञान व कंपनीचे वातावरण पूर्णपणे बदललेले असते. अशा स्थितीत बडतर्फ कामगाराला पुन्हा कामावर घेणे व्यावहारिकदृष्ट्या कठीण होते, असे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने बडतर्फ कामगाराला दिलासा देण्यास नकार दिला. यावेळी औद्योगिक न्यायालयाचा ७ लाख रुपयांच्या भरपाईचा आदेश कायम ठेवत रकमेत वाढ करण्याचे संकेत दिले. पुण्यातील कंपनीत काम करणाऱ्या संतोष पोतदार या २०१२ मध्ये कामगाराने उच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. याचिकाकर्त्या कामगारावर गैरवर्तनाचे आरोप ठेवून आरोपपत्र दाखल केले होते. २०१४ मध्ये चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. त्याविरोधात कामगाराने सुरुवातीला औद्योगिक न्यायालयात घेतली होती. त्यावर औद्योगिक न्यायालयाने कामगाराची बडतर्फी प्रक्रिया चुकीची ठरवली.

# उपनगरीय रुग्णालयांमध्ये सिटीस्कॅन एमआरआयची सुविधा



**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या चार उपनगरीय रुग्णालयांत सिटीस्कॅन एमआरआय मशीन लवकरच उपलब्ध करण्यात येणार आहेत. वांद्रे येथील के. बी. भाभा, कांदिवलीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेव आंबेडकर, बोरिवलीतील भगवती व मुलुंड येथील एम. टी. अगरवाल रुग्णालयात या मशीन उपलब्ध होणार आहेत. पालिकेच्या या निर्णयामुळे उपनगरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबई पालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांत पालिकेच्या वतीने किंवा खासगी सहभाग तत्त्वावर एमआरआय तसेच सीटीस्कॅनची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. या मागणीनुसार, महापालिकेच्या आरोग्य विभागाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली येथील पहिल्या मजल्यावरील 'ए' विंगमधील १४८.६४ चौ. व १३९ चौ.मी. एवढ्या क्षेत्रफळाची जागा भाडे तत्त्वावर देण्याचा निर्णय घेत तिथे एमआरआय आणि सीटीस्कॅन सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी प्रतिवर्ष सुमारे दोन लाख रुपयांचे भाडे आकारले जाणार आहे. यासाठी क्रस्ना डायग्नोस्टिक्स लिमिटेड या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे, तर वांद्रे भाभा रुग्णालयाच्या तळमजल्यावरील १७६.७२ चौ. मी. आणि १६०.३४ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाची जागा अनुक्रमे एमआरआय आणि सीटीस्कॅन प्रति वर्ष ६,००,००० प्रति वर्ष यानुसार क्रस्ना डायग्नोस्टिक्स लिमिटेड या संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे, तर बोरिवलीतील हरीलाल भगवती रुग्णालयातील तळमजल्यावरील २७२.३२ चौ.मी. आणि २५९.६८ चौ.मी. एवढ्या क्षेत्रफळाची जागा, अनुक्रमे एमआरआय आणि सीटीस्कॅन करता प्रति वर्ष ७,९५,००० प्रति वर्ष यानुसार पल्स हायटेक हेल्थ सर्व्हिसेस प्रा. लि. या संस्थेला तर मुलुंड येथील म. तु. अगरवाल रुग्णालयाच्या तळमजल्यावरील १९१.८० चौ.मी. आणि १९२.९८ चौ.मी. एवढ्या क्षेत्रफळाची जागा, अनुक्रमे एमआरआय आणि सीटीस्कॅन सुविधेसाठी रुबी ऐल केअर सव्र्हिसेस प्रा. लि. या संस्थेला प्रति वर्ष ६,११,००० याप्रमाणे भाडेकरारावर देण्याचा निर्णय घेतला आहे.

# बुद्ध जयंती प्रबोधनाचा महोत्सव ठरला पाहिजे - प्रा. आनंद देवडेकर

**मुंबई, प्रतिनिधी**

बुद्ध जयंती केवळ उत्सव म्हणून न साजरी करता ती समाज परिवर्तनासाठी प्रबोधनाचा महोत्सव ठरली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. आनंद देवडेकर यांनी केले. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र, मुंबई यांच्या वतीने आयोजित बुद्ध जयंती सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अंधेरी पश्चिम चार बंगला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी भवनात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या संस्थेचे अध्यक्ष विजय जाधव होते.

यावेळी प्रमुख वक्ते जीएसटी आयुक्त राजेश ढाबरे, ज्येष्ठ साहित्यिक अर्जुन डांगळे, संस्थेचे सरचिटणीस चंद्रकांत बच्छाव तसेच चिटणीस रत्नाकर रिपोटे आदी उपस्थित होते. देवडेकर यांनी गौतम बुद्ध यांच्या जीवनकार्याचा सखोल आढावा घेत वैशाख पौर्णिमेचे ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित केले. राजेश ढाबरे यांनी ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करत 'अज्ञान हेच सर्व दुःखांचे मूळ आहे,' असे सांगितले. विजय जाधव यांनी 'धम्म हा केवळ बोलण्याचा विषय नसून आचरणाचा मार्ग आहे,' असा संदेश दिला. यावेळी केंद्राचे विश्वस्त नितीन सोनवणे, सदाशिव गांगुर्डे, नीता हरिनामे, सुनील वाघ, संजय जाधव यांच्यासह अमोल कीर्तिकर, मेघना माने, राजेश शेट्टे, ज्योत्स्ना दिघे, स्वाती तावडे, अर्चना बच्छाव, बाबूजी रामटेके, विवेक वाघ, डॉ. भावना ढाबरे आदी उपस्थित होते.

# संपादकीय

## अमेरिका-इराण संघर्षामुळे निर्माण झालेले जागतिक संकट

होर्मुज सामुद्रधुनीवर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या इराणच्या प्रयत्नांना प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने इराणी बंदरांवर घातलेल्या नाकेबंदीमुळे संपूर्ण जगात ऊर्जा संकट केवळ कायमच नाही, तर अधिक गंभीर होत चालले आहे. अमेरिका इराणच्या तेलवाहू जहाजांना मार्ग देत नाही, तर इराण होर्मुजमार्गे तेल आणि वायू घेऊन जाणाऱ्या जहाजांना अडथळा निर्माण करत आहे. दोन्ही देशांनी आक्रमक आणि हट्टी भूमिका घेतल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे, अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धविराम लागू असतानाही ही परिस्थिती कायम आहे. सध्या या युद्धविरामाचा जगाला कोणताही ठोस लाभ होताना दिसत नाही, कारण पश्चिम आशियातील संकट जैसे थे आहे आणि होर्मुज सामुद्रधुनी अद्यापही सुरळीत झालेली नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी युद्धविराम अनिश्चित काळासाठी वाढविल्यानंतर इराणवर अणुकराराच्या मुद्यावर लवकर तोडगा काढण्यासाठी दबाव वाढविला. सुरुवातीला इराणने या दबावाला विरोध केला, मात्र अमेरिकेच्या बंदर नाकेबंदीमुळे तो आता अस्वस्थ झालेला दिसत आहे. यामागचे कारण म्हणजे इराण उत्पादन करत असलेल्या तेलाची निर्यात करू शकत नाही आणि अतिरिक्त साठवणुकीची त्याची क्षमता जवळपास संपत आली आहे. त्यामुळे त्याला तेलविहिरी बंद करण्याची वेळ येऊ शकते, ज्यामुळे दीर्घकालीन नुकसान होण्याची शक्यता आहे. कदाचित याच कारणामुळे इराणने पाकिस्तानमार्फत अमेरिकेला नवीन प्रस्ताव पाठविला, मात्र तो ट्रम्प यांना मान्य झाला नाही. आता पुढे इराण आणि अमेरिका कोणती भूमिका घेतात, याकडे जगाचे लक्ष लागले आहे. जर इराणने अणुकराराच्या मुद्यावर तडजोड करण्यास नकार दिलाच, तर अमेरिका पुन्हा कठोर कारवाई करू शकते. मात्र ट्रम्प यांच्यासाठी हे सोपे नाही, कारण पश्चिम आशियातील संकटावरून त्यांच्यावर देशांतर्गत टीका होत आहे. अमेरिकेचे संरक्षणमंत्रीही विरोधी डेमोक्रॅट खासदारांना हे स्पष्ट करू शकलेले नाहीत की, इराणविरुद्ध चाललेल्या ४० दिवसांच्या संघर्षातून अमेरिकेला नेमके काय साध्य झाले. अमेरिका आणि इराण यांच्यातील पहिल्या फेरीतील चर्चा अपयशी ठरल्यानंतर, तसेच दुसऱ्या फेरीसाठी पाकिस्तानचे प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर ट्रम्प यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी चर्चा केली. मात्र त्यातूनही कोणताही ठोस तोडगा निघालेला दिसत नाही. या चर्चेत रशियाने इराणकडील समृद्ध युरेनियम स्वतःकडे ठेवण्याचा प्रस्ताव मांडला, मात्र त्यासाठी इराणची संमती आवश्यक आहे. आज खरा प्रश्न अमेरिका-इराण युद्धविराम टिकणार का हा नसून, होर्मुज सामुद्रधुनी खुली होणार का हा आहे. जर हा सागरी मार्ग खुला झाला नाही, तर तेल आणि वायूचे दर कमी होण्याची शक्यता नाही. उलट दर वाढत राहिल्यास जागतिक अर्थव्यवस्था डगमगू शकते. अनेक देशांमध्ये तेल आणि वायूचे दर आधीच वाढले आहेत. त्याचा प्रतिकूल परिणाम उद्योग, व्यवसाय आणि रोजगारावर होत आहे. भारतामध्ये सध्या एलपीजीच्या तुटवड्याची समस्या जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारला व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर वाढवावे लागले आहेत. काही काळापासून कारखान्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वायूच्या पुरवठ्यातही कमतरता दिसत आहे, ज्याचा उत्पादनावर परिणाम होत आहे. काही ठिकाणी कामगारांच्या कामाच्या तासांमध्ये आणि कामकाजाच्या दिवसांमध्ये कपात करण्याची वेळ आली आहे. याशिवाय निर्यातदारांना खाडी देशांकडे माल पाठविण्यात अडचणी येत आहेत, तर खाडी देशांतून तेल-वायूसह इतर वस्तूंच्या आयातीतही अडथळे निर्माण झाले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल १२५ डॉलरच्या पुढे गेले आहेत, तर रुपया डॉलरच्या तुलनेत ९५ च्या पुढे घसरला आहे. भारतासाठी ही दुहेरी आर्थिक अडचण आहे, कारण त्यामुळे आयात खर्च वाढत आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती आणि रुपयातील घसरण यामुळे महागाई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. तेल कंपन्यांना तोटा कमी करण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढवावे लागण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास महागाई आणखी वेगाने वाढेल आणि सर्वसामान्य नागरिकांसह सरकारपुढेही मोठे आव्हान उभे राहील. सरकारने याआधी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता, मात्र दीर्घकाळ ही भूमिका कायम ठेवणे कठीण ठरू शकते. सरकारने सध्या पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवले असले, तरी व्यावसायिक गॅस सिलिंडर आणि विमान इंधनाचे दर वाढवावे लागले आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय हवाई प्रवास महागला आहे आणि काही विमान कंपन्यांच्या देशांतर्गत सेवांवरही त्याचा परिणाम दिसू लागला आहे. ऊर्जा संकटाचा परिणाम केवळ इंधनापुरता मर्यादित नाही. खतनिर्मितीसाठी नैसर्गिक वायूचा वापर होत असल्याने खतांचे दर वाढण्याची आणि पुरवठा कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच पेट्रोलियम शुद्धीकरणातून तयार होणाऱ्या तारकोलाच्या पुरवठ्यातही अडचणी निर्माण होत आहेत. जर अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कायम राहिला आणि होर्मुज सामुद्रधुनी खुली झाली नाही, तर पश्चिम आशियातील हे संकट संपूर्ण जगासाठी आणखी गंभीर रूप धारण करू शकते. यासाठी केवळ अमेरिका आणि इस्रायल नव्हे, तर इराणही जबाबदार ठरेल, कारण तोदेखील आता कठोर आणि तडजोड न करणारी भूमिका घेताना दिसत आहे. अमेरिका इराणने युरेनियम संवर्धन कार्यक्रम स्थगित करावा अशी मागणी करत आहे, तर इराणने यावर कोणतीही तडजोड होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा संघर्ष लवकर संपण्याची चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत.

## आगीच्या घटनांची वाढती मालिका

उन्हाळ्याची तीव्रता वाढताच घरे, कारखाने आणि इतर ठिकाणी आग लागण्याच्या घटनांमध्ये होत असलेली वाढ चिंतेचा विषय ठरत आहे, कारण येत्या काळात तापमान आणखी वाढण्याची शक्यता आहे. याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे बहुतांश आगीच्या घटना वातानुकूलन यंत्रात झालेला स्फोट किंवा शॉर्टसर्किट यांमुळे घडत आहेत. अलीकडेच दिल्लीतील विवेक विहार परिसरातील एका चार मजली इमारतीतील फ्लॅटमध्ये एसीचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या आगीने इतर फ्लॅटनाही वेढले आणि त्यात नऊ जणांचा मृत्यू झाला. त्याच्या आदल्या दिवशी दिल्लीतीलच जौहरीपूर येथे एसीचा स्फोट होऊन एका बालकाचा मृत्यू झाला होता. त्याआधी दिल्लीजवळील इंदिरापूरम येथील बहुमजली इमारतीत शॉर्टसर्किटमुळे आग लागली होती. या घटनेत जीवितहानी टळली, मात्र अनेक फ्लॅट पूर्णतः जळून खाक झाले. या दुर्घटनेत गाझियाबाद अग्निशमन विभागाकडे अशा प्रकारच्या आगीवर त्वरीत नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक साधनसामग्री पुरेशी नसल्याचेही समोर आले. या घटना केवळ दिल्ली आणि आसपासच्या परिसरापुरत्याच मर्यादित नाहीत. देशातील इतर शहरांतही अशाच प्रकारच्या दुर्घटना घडत असून, त्यामागे एसी किंवा इतर विद्युत उपकरणांतील तांत्रिक बिघाड हे मुख्य कारण असल्याचे निदर्शनास येत आहे. यावरून देशात विद्युत उपकरणांच्या निर्मितीत गुणवत्ता मानकांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे स्पष्ट होते. विशेषतः वातानुकूलन यंत्रांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर असल्याचे दिसून येते. विद्युत उपकरणांची निर्मिती निश्चित गुणवत्ता निकषांनुसार व्हावी, यासाठी असलेले नियम आणि कायदे प्रभावीपणे अंमलात आणण्याची गरज आहे. भारतात विद्युत उपकरणांसह विविध उत्पादनांसाठी गुणवत्ता मानके निश्चित करण्यात आली आहेत, मात्र अनेक उत्पादक कंपन्या त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आढळते. निकृष्ट दर्जाची उत्पादने तयार करणे म्हणजे ग्राहकांची फसवणूकच होय, आणि अनेकदा ही फसवणूक जीवघेणीही ठरते. निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांची समस्या काही नवीन नाही. या समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवता आले नसल्याने अशा उत्पादनांचे उत्पादन आणि विक्री सुरूच आहे. पंतप्रधानांनी अनेकदा उद्योजकांना उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करण्याचे आवाहन केले आहे, कारण जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी उत्पादने जागतिक दर्जाची असणे आवश्यक आहे. मात्र त्यांच्या या आवाहनाचाही अपेक्षित परिणाम होताना दिसत नाही. अशा परिस्थितीत भारतीय मानक ब्यूरो यांनी अधिक सजग आणि सक्रिय भूमिका घेण्याची गरज आहे. तोपर्यंत नागरिकांनी विद्युत उपकरणांचा वापर करताना अधिक दक्षता बाळगणे आणि नियमित तपासणी करून घेणे अत्यावश्यक आहे.

# मतदानात आघाडी, सत्तेत मागे महिला मतदारांचा विरोधाभास

चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात सुरू असलेल्या निवडणुकांमुळे भारतातील महिला मतदार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. भारताच्या निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, या निवडणुकांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक दिसते; तामिळनाडू, केरळ आणि पुडुचेरी येथे महिला मतदार पुरुषांपेक्षा जास्त आहेत, तर आसाममध्ये दोघांची संख्या जवळपास समान आहे. पश्चिम बंगाल हे एकमेव राज्य आहे जिथे पुरुष मतदारांचे प्रमाण थोडे जास्त, म्हणजे 51.2 टक्के आहे. विशेष पुनरावलोकन प्रक्रियेनंतर मतदार याद्यांमध्ये हा फरक पुरुषांच्या बाजूने आणखी वाढला आहे.

या विधानसभा निवडणुकांमध्ये दिसणारे चित्र देशपातळीवरील प्रवृत्तींशी जुळते. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांचे प्रमाण 48.62 टक्क्यांपर्यंत पोहोचले, जे आतापर्यंतचे सर्वाधिक आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे, महिलांची एकूण संख्या पुरुषांपेक्षा थोडी कमी असली तरी मतदानाच्या वेळी महिलांनी पुरुषांपेक्षा अधिक मतदान केले, सलग दुसऱ्यांदा, आणि 2019 मध्येही अशीच प्रवृत्ती दिसली होती. महिला मतदानात झालेली वाढ अनेक कारणांमुळे झाली आहे, जसे की महिलांमधील साक्षरतेत वाढ, स्वावलंबन, स्थानिक पातळीवरील जनजागृती आणि निवडणूक आयोगाचे विशेष उपक्रम. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या बदलातून महिलांच्या विचारसरणीत झालेला मोठा बदल दिसतो, जिथे मतदान हा केवळ कर्तव्य नसून स्वतःच्या सक्षमीकरणाचा आणि निर्णयक्षमतेचा एक स्वेच्छेचा मार्ग म्हणून पाहिला जात आहे.

भारताच्या निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, या निवडणुकांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त दिसते; तामिळनाडू, केरळ आणि पुडुचेरी येथे महिला मतदार पुरुषांपेक्षा अधिक आहेत, तर आसाममध्ये दोघांची संख्या जवळपास समान आहे.

महिला मतदारांचा वाढता प्रभाव आता सर्वमान्य झाला असला तरी, या बदलाचा भारतीय राजकारण आणि प्रशासनावर काय परिणाम होतो, याचा अधिक सखोल विचार करणे गरजेचे आहे. दीर्घकाळ, विशेषतः 1990 पर्यंत, पुरुष मतदारांची संख्या महिलांपेक्षा खूप जास्त होती. 1951–52 मधील भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत जवळपास 2.8 दशलक्ष महिलांना निवडणूक आयोगाने अपात्र ठरवले होते, कारण त्यांनी स्वतःची ओळख स्वतंत्र नावाने न देता “अमुकची आई” किंवा “तमुकची पत्नी” अशा प्रकारे नोंदवली होती. त्या काळापासून आजपर्यंत झालेला बदल मोठा आहे. आता महिलांच्या मतदानाच्या निर्णयांचा थेट परिणाम पक्षांच्या रणनीती आणि निवडणूक निकालांवर होतो, असे Lokniti–Centre for the Study of Developing Societies (CSDS) च्या आकडेवारीतून दिसते.

महिलांचा निवडणूक प्रक्रियेत सहभाग वाढला आणि त्यांच्यासाठी अनेक योजना राबवल्या गेल्या असल्या तरी, याचा परिणाम त्यांच्या प्रतिनिधित्वात तितकासा दिसत नाही. 2021 च्या आकडेवारीनुसार, या निवडणूक होणाऱ्या राज्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अजूनही



कमी आहे. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक 13.7 टक्के महिला प्रतिनिधित्व आहे, त्यानंतर केरळ (7.86 टक्के), तामिळनाडू (5.13 टक्के), आसाम (4.76 टक्के) आणि पुडुचेरीमध्ये सर्वात कमी 3.33 टक्के आहे.

1951–52 मधील भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत जवळपास 2.8 दशलक्ष महिलांना निवडणूक आयोगाने अपात्र ठरवले होते, कारण त्यांनी स्वतःची ओळख स्वतःच्या नावाने न देता “अमुकची आई” किंवा “तमुकची पत्नी” अशा प्रकारे नोंदवली होती.

महिलाकेंद्रित कल्याण योजनांचा विस्तार

निवडणुका होत असलेल्या या पाच राज्यांमध्ये महिलांची निर्णायक मतदार म्हणून वाढती भूमिका अलीकडील महिलाकेंद्रित योजनांच्या विस्ताराशी घट्टपणे जोडलेली आहे. या योजना भारताच्या राजकीय अर्थव्यवस्थेत होत असलेल्या व्यापक बदलाचे संकेत देतात. राज्य सरकारे महिलांसाठी थेट आर्थिक मदत, प्रवास सवलती, शिक्षण आणि उपजीविका यांसारख्या क्षेत्रांत विविध योजना राबवत आहेत, ज्यामुळे सामाजिक संरक्षण, राजकीय सहभाग आणि मतदानाच्या वर्तनामध्ये थेट संबंध निर्माण होत आहे.

तामिळनाडू: 2021 च्या निवडणुकांनंतर तामिळनाडूमध्ये अशा योजनांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. ‘Kalaignar Magalir Urimai Thittam’ या योजनेअंतर्गत कुटुंब प्रमुख महिलांना दरमहा रुपये 1,000 दिले जाते, तर ‘Magalir Vidiyal Payanam’ अंतर्गत महिलांसाठी मोफत बस प्रवासाची सुविधा आहे. या दोन्ही योजनांनी महिलांच्या सक्षमीकरणावर सकारात्मक परिणाम केला आहे. याशिवाय, ‘Pudhumai Penn Thittam’ अंतर्गत मुलींच्या उच्च शिक्षणासाठी दरमहा रुपये 1,000 दिले जाते. 2024 मध्ये लागू झालेली ‘Tamil Nadu State Policy for Women’ ही महिलांसाठी स्पष्ट धोरण असलेले तामिळनाडू हे एकमेव राज्य आहे, ज्याचा उद्देश महिलांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देणे आहे.

आसाम: 2020 मध्ये ‘Orunodoi’ योजनेद्वारे महिलांसाठी थेट आर्थिक मदत देणाऱ्या पहिल्या राज्यांपैकी आसाम एक आहे. या योजनेत कुटुंब प्रमुख महिलांना दरमहा रुपये 1,250 दिले जाते. ‘Mukhya Mantrir Nijut Moina’ अंतर्गत मुलींच्या उच्च शिक्षणासाठी दरमहा रुपये 1,250 ची मदत दिली जाते. स्थानिक महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी ‘Mukhyamantri Mahila Udyamita Abhiyaan’ अंतर्गत स्वयंसहायता गटांतील महिलांना रुपये 10,000 पर्यंत सूक्ष्म अनुदान दिले जाते. ‘Sakhi Express’ योजनेअंतर्गत महिलांना स्कूटर देण्यात आल्या आहेत, तसेच ‘Swanirbhar Naari’ योजनेद्वारे स्थानिक महिला विणकरांना विशेष मदत दिली जाते.

निवडणुका होत असलेल्या या पाच राज्यांमध्ये महिलांची निर्णायक मतदार म्हणून वाढती भूमिका अलीकडील महिलाकेंद्रित योजनांच्या विस्ताराशी घट्टपणे जोडलेली आहे. या योजना भारताच्या राजकीय अर्थव्यवस्थेत होत असलेल्या व्यापक बदलाचे संकेत देतात.

केरळ: केरळ हे एकमेव राज्य आहे जिथे महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर थेट आर्थिक मदत योजना नाही. निवडणुकीच्या आधी ‘Sthree Suraksha’ अंतर्गत बेरोजगार महिलांसाठी दरमहा रुपये 1,000 पेन्शन जाहीर करण्यात आली. राज्याने ‘Kudumbashree’ या ग्रामीण उपजीविका कार्यक्रमाद्वारे संस्थात्मक बळकटीकरणावर भर दिला आहे, ज्याने गरिबी कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, तसेच महिला शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची मदत दिली आहे. इतर राज्यांच्या तुलनेत केरळची पद्धत वेगळी आहे. थेट आर्थिक मदतीऐवजी संस्थात्मक विकास आणि सामूहिक आर्थिक सक्षमीकरणावर अधिक भर दिला जातो.

पश्चिम बंगाल: 2021 च्या निवडणुकीपूर्वी ‘Lakshmir Bhandar’ ही थेट आर्थिक मदत योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे महिलांना आर्थिक सुरक्षितता मिळाली आणि राजकीय पाठिंबा वाढवण्यातही ती महत्त्वाची ठरली. ‘Kanyashree Prakalpa’ (मुलींच्या शिक्षणासाठी मदत), ‘Sabuj Sathi’ (विद्यार्थ्यांसाठी मोफत सायकली) आणि ‘Rupashree Prakalpa’ (लग्नासाठी आर्थिक मदत) या योजनांसोबत ही योजना पूरक ठरते.

पुडुचेरी: 2023 पासून सरकारकडून गरीबी रेषेखाली (BPL) जीवन जगणाऱ्या कुटुंबप्रमुख महिलांना ‘Grant of Monthly Financial Assistance to Women who are Heads of Families Living Below Poverty Line (BPL)’ या योजनेअंतर्गत दरमहा INR 1,000 दिले जात होते, जे या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाढवून INR 2,500 करण्यात आले आहे. पुडुचेरीमध्ये सकारात्मक लिंग गुणोत्तर असून सर्व मतदारसंघांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे.

प्रतिनिधित्वाचा विरोधाभास

तीन दशकांपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण लागू करताना एक महत्त्वाची अपेक्षा होती की यामुळे ‘पाईपलाईन इफेक्ट’ तयार होईल. म्हणजे, स्थानिक पातळीवरील सातत्यपूर्ण सहभागातून महिला नेतृत्व विकसित होईल आणि पुढे विधानसभा व संसदेत त्यांचे प्रतिनिधित्व वाढेल. मात्र, प्रत्यक्षात राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अजूनही कमीच आहे. आजही छत्तीसगडमध्ये सर्वाधिक, सुमारे 21 टक्के महिला आमदार आहेत, तर इतर राज्ये त्यापेक्षा मागे आहेत. राष्ट्रीय पातळीवर लोकसभेत महिलांचे प्रमाण सुमारे 13.6 टक्के आहे, जे 2019 पेक्षा कमी आहे आणि जागतिक सरासरी सुमारे 27 टक्क्यांपेक्षा खूपच कमी आहे.

केरळ आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये पंचायत स्तरावर महिलांचे प्रतिनिधित्व तुलनेने चांगले असले तरी, या ‘पाईपलाईन इफेक्ट’चा परिणाम मर्यादित राहिल्याचे दिसते. यावरून स्थानिक स्तरावरून राज्य पातळीवर जाण्यात अनेक अडथळे असल्याचे स्पष्ट होते.

केरळ आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमधील अनुभव दर्शवतो की पंचायत स्तरावर महिलांची चांगली उपस्थिती असूनही पुढच्या स्तरावर त्यांचे प्रमाण वाढत नाही. यामागे काही संरचनात्मक अडचणी आहेत, जसे की पुरेसा पाठिंबा नसणे, पक्षांमध्ये मर्यादित संधी, निवडणुकीचा वाढता खर्च आणि अजूनही टिकून असलेले सामाजिक व लैंगिक भेदभाव.

याशिवाय, राजकीय पक्षांच्या महिलाकेंद्रित योजनांमुळे स्वतंत्र महिला मतदार गट तयार झाल्यासारखे वाटते, पण प्रत्यक्षात महिलांचे मतदान निर्णय केवळ लिंगावर आधारित नसतात. जात, वर्ग, प्रदेश, मिळालेल्या कल्याणकारी योजनांचा अनुभव आणि दैनंदिन जीवनातील वास्तव या घटकांचा त्यावर मोठा प्रभाव असतो. भारताची लोकशाही अधिक मजबूत तेव्हाच होईल, जेव्हा या विविध पार्श्वभूमीतील महिला संसद आणि विधानसभांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळवतील.

# मोबाईलमध्ये अडकलेली पिढी... भारताचं भविष्य हातातून निसटतंय का?

भारताचे मध्यम वय 28 वर्षे आहे, आणि सुमारे 65 टक्के लोकसंख्या 35 वर्षांखालील आहे. 2055 पर्यंत भारत जगातील सर्वात तरुण देश राहण्याची अपेक्षा आहे, आणि भारताची मोठी व तरुण लोकसंख्या ही एक महत्त्वाची आर्थिक ताकद मानली जाते. मात्र, भारताचा लोकसंख्यात्मक लाभ आपोआप मिळत नाही; तो मूलतः मानवी भांडवलाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. ही गुणवत्ता लहानपणीच घडते शाळांमध्ये, घरांमध्ये आणि वर्गखोल्यांमध्ये ज्या आता वाढत्या प्रमाणात डिजिटल होत आहेत.

गेल्या दशकात भारताने डिजिटल प्रवेशात अभूतपूर्व वाढ अनुभवली आहे. इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या 2014 मधील 250 दशलक्षांवरून सप्टेंबर 2025 पर्यंत जवळपास 1.02 अब्जांपर्यंत पोहोचली आहे, ज्यामध्ये 500 दशलक्ष युनिक सोशल मीडिया वापरकर्ते आहेत. स्वस्त स्मार्टफोन्स आणि कमी डेटा खर्चामुळे सुमारे 750 दशलक्ष उपकरणांसह भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा स्मार्टफोन बाजार बनला आहे. प्रति वापरकर्ता सरासरी मासिक डेटा वापरात मोठी वाढ झाली आहे जी 2014 मधील 62 मेगाबाइट्सवरून 2025 मध्ये सुमारे 24 गिगाबाइट्सपर्यंत, म्हणजेच जवळपास 399 पटीने वाढली आहे.

विद्यार्थ्यांसाठी याचा अर्थ शिक्षणात्मक सामग्री म्हणजेच कंटेंटची अधिक उपलब्धता, अडथळ्यांच्या काळात शिक्षणाची सातत्यता आणि नव्या ज्ञानप्रकारांचा परिचय असा झाला आहे. मात्र, या बदलामुळे मानवी भांडवलाच्या समीकरणात एक नवीन घटक निर्माण झाला आहे आणि तो म्हणजे डिजिटल वापराची तीव्रता आणि स्वरूप. ASER च्या 2024 सर्वेक्षणानुसार, 14 ते 16 वयोगटातील सुमारे 82.2 टक्के किशोरवयीन मुलांना स्मार्टफोन वापरता येतो; परंतु त्यापैकी केवळ 57 टक्के शैक्षणिक कारणांसाठी त्याचा वापर करतात, तर 76 टक्के मुख्यतः सोशल मीडियासाठी वापर करतात. देशभरातील विविध अभ्यासांमध्ये मुलांमध्ये अधिक स्क्रीन टाइम दिसून आला आहे: नॅशनल काऊन्सिल ऑफ CBSE स्कूल्स (NCCS) च्या अलीकडील अभ्यासानुसार, सुमारे 74 टक्के विद्यार्थी दररोज दोन तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर घालवतात (शैक्षणिक वापराव्यतिरिक्त), आणि त्यापैकी सुमारे 21 टक्के विद्यार्थी चार तासांपेक्षा जास्त वेळ घालवतात. पुण्याजवळील ग्रामीण भागातील एका अभ्यासात 8वी ते 10वी तील 83.2 टक्के विद्यार्थ्यांमध्ये अधिक स्क्रीन टाइम आढळला. शहरी भारतात, 49 टक्के पालकांनी सांगितले की त्यांची मुले दररोज 3 तासांपेक्षा जास्त वेळ सोशल मीडिया, व्हिडिओ/OTT आणि ऑनलाइन गेमिंगवर घालवतात. पाच वर्षांखालील मुलांमध्येही सरासरी 2.22 तासांचा स्क्रीन वापर नोंदवला गेला आहे, जो इंडियन अकॅडमी ऑफ पेडिएट्रिक्स (IAP) ने सुचवलेल्या दररोज 1 तासाच्या मर्यादेपेक्षा खूप जास्त आहे.

या वाढत्या स्क्रीन वापराचा मुलांच्या शारीरिक, संज्ञानात्मक आणि सामाजिक-भावनिक विकासावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे आढळले आहे.



यामध्ये पुढील परिणामांचा समावेश होतो:

संज्ञानात्मक परिणाम: लक्ष केंद्रीत करण्यात अडचण, समज कमी होणे आणि माहिती लक्षात ठेवण्याची क्षमता घटणे.

आरोग्यावरील परिणाम: बसण्याच्या चुकीच्या स्थितीमुळे त्रास, डोळ्यांवरील ताण, झोपेचे विकार, शारीरिक हालचालीत घट आणि लठ्ठपणाचा धोका वाढणे.

वर्तनात्मक परिणाम: तणाव आणि चिंतेत वाढ, आक्रमकता वाढणे, शरीराविषयी नकारात्मक भावना आणि सामाजिक-भावनिक कौशल्यांमध्ये घट.

वेळेच्या वापरावर परिणाम: वाचन, गृहपाठ आणि सामाजिक संवादासाठी उपलब्ध वेळ कमी होणे.

म्हणूनच, डिजिटल उपलब्धता आणि वापराच्या फायद्यांसोबतच एक अधिक गुंतागुंतीचे वास्तव समोर येत आहे. विद्यार्थ्यांचे डिजिटल वातावरण हे मानवी भांडवल निर्मितीचा एक संरचनात्मक घटक बनत आहे. त्यामुळे धोरणात्मक आव्हान केवळ डिजिटल साधनांचा प्रवेश सुनिश्चित करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर या साधनांचा वापर शिक्षण सुधारण्यासाठी होईल याची खात्री करणे आवश्यक आहे.

धोरणात्मक आव्हान केवळ डिजिटल साधनांचा प्रवेश सुनिश्चित करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर या साधनांचा वापर शिक्षण सुधारण्यासाठी होईल याची खात्री करणे आवश्यक आहे.

धोरणात्मक बदलाची प्रक्रिया सुरू

विद्यार्थी आणि डिजिटल तंत्रज्ञानाबाबत भारतातील धोरणात्मक दृष्टिकोनात लक्षणीय बदल झाला आहे. पूर्वीच्या “प्रवेश आणि संधी” या चौकटीतून तो आता “नियंत्रित वापर आणि बालसंरक्षण” या चौकटीकडे वळला आहे, जिथे राज्य मुलांच्या डिजिटल जीवनाकडे मानसिक आरोग्य, सुरक्षितता, हक्क आणि प्लॅटफॉर्म प्रशासनाच्या दृष्टीने पाहू लागले आहे.

भारताच्या पूर्वीच्या धोरणांमध्ये अधिक सावध आणि टप्प्याटप्प्याने झालेली प्रगती दिसून येते. 2020 मध्ये डिजिटल शिक्षणासाठी जारी केलेल्या प्रग्यता (PRAGYATA) मार्गदर्शक तत्त्वांमध्ये शिक्षणाची सातत्यता राखण्यावर भर होता, पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे कल्याण, सुरक्षितता, पालकांचे निरीक्षण आणि वयानुसार स्क्रीन टाइम मर्यादा यांचाही विचार करण्यात आला होता. त्याचप्रमाणे, नॅशनल एज्युकेशन पॉलिसी (NEP) 2020 हा व्यापकदृष्ट्या तंत्रज्ञानाबाबत सकारात्मक आहे. तो शिक्षणात प्रवेश, नवकल्पना, लवचिकता आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाला एक सक्षम साधन मानतो. NEP मध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर स्पष्ट भर आहे आणि ऑनलाइन व डिजिटल शिक्षणाला सातत्य आणि समानतेसाठी महत्त्वाचे मानले गेले आहे. मात्र, येथेही पुढील बदलाची चिन्हे दिसतात: त्यात “संभाव्य धोके” मान्य केले गेले आहेत आणि विद्यार्थ्यांच्या उपकरणांवरील व्यसनासारख्या मुद्द्यांवर प्राथमिक अभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

2022 मध्ये इंडियन अकॅडमी ऑफ पेडिएट्रिक्स (IAP) च्या मार्गदर्शक तत्त्वांनी स्क्रीन-आधारित माध्यमांवर आणि अधिक स्क्रीन टाइमवर अभ्यास केला आणि लवकर व दीर्घकाळ स्क्रीन संपर्कामुळे होणारे नकारात्मक परिणाम अधोरेखित केले. इकॉनॉमिक सर्वे 2025-26 मध्ये प्रथमच “डिजिटल व्यसन” या विषयावर स्वतंत्र विभाग समाविष्ट करण्यात आला, ज्यामध्ये त्याचे “खरे आर्थिक आणि सामाजिक परिणाम” अधोरेखित केले गेले आणि स्क्रीन टाइम कमी करण्यासाठी विविध उपाय सुचवले गेले: वय पडताळणी आणि वयानुसार सेटिंग्ज, डिजिटल वेलनेस अभ्यासक्रम, शाळांमध्ये अनिवार्य शारीरिक क्रिया, तंत्रज्ञान-मुक्त क्षेत्रे, जनजागृती कार्यक्रम आणि पालकांसाठी कार्यशाळा.

बालहक्क आणि शिक्षणाशी संबंधित संस्थांनीही या मुद्द्याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. सायबर सुरक्षितता, जबाबदार डिजिटल वापर आणि स्क्रीन टाइम व्यवस्थापन यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे शाळांमध्ये आणि सार्वजनिक मोहिमांमध्ये समाविष्ट केली जात आहेत. नियामक पातळीवर, उदयोन्मुख डेटा संरक्षण चौकटी मुलांसाठी विशेष सुरक्षा उपाय आणत आहेत, विशेषतः प्रोफाइलिंग आणि लक्ष्यित डिजिटल सहभाग किंवा जाहिरातींविरुद्ध.

इकॉनॉमिक सर्वे 2025-26 मध्ये प्रथमच “डिजिटल व्यसन” या विषयावर स्वतंत्र विभाग समाविष्ट करण्यात आला, ज्यामध्ये त्याचे “खरे आर्थिक आणि सामाजिक परिणाम” अधोरेखित केले गेले आणि स्क्रीन टाइम कमी करण्यासाठी विविध उपाय सुचवले गेले.

राज्य स्तरावरही धोरणात्मक प्रतिसाद अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. अनेक राज्यांनी शाळांमध्ये मोबाईल फोन वापरावर निर्बंध घालण्यास सुरुवात केली आहे किंवा त्याबाबत विचार सुरू आहेत, तसेच ऑफलाइन शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्क्रीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मोहिमा राबवल्या जात आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्राने अल्पवयीनांवर सोशल मीडियाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे, तर कर्नाटक लहान विद्यार्थ्यांसाठी मोबाईल आणि सोशल मीडिया वापराबाबत अधिक कठोर नियम तयार करत असल्याचे समोर आले आहे. या उपाययोजना सूचित करतात की धोरणात्मक चर्चा केवळ सल्ल्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती मुलांच्या डिजिटल वातावरणाच्या सक्रिय नियमनाकडे वळत आहे.

या उपाययोजना अजूनही असमान असल्या तरी, त्या एका व्यापक जाणीवेचे प्रतीक आहेत. विद्यार्थ्यांच्या डिजिटल वापराचे सक्रिय नियमन आवश्यक आहे, विशेषतः जेव्हा त्याचा मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांवर एकत्रित परिणाम होतो आणि मानवी भांडवल निर्मितीवर प्रणालीगत धोका निर्माण होतो.

भारताच्या मानवी भांडवलावर परिणाम

भारताच्या मानवी भांडवलाशी संबंधित आव्हाने चांगल्या प्रकारे ज्ञात आहेत. शिक्षणाच्या उपलब्धतेत सुधारणा झाल्या असल्या तरी शिकण्याचे परिणाम, रोजगारक्षमता आणि कौशल्य तयारीबाबत चिंता कायम आहेत. जर डिजिटल वातावरणामुळे लक्ष केंद्रित करण्याची आणि शिकण्याची क्षमता आणखी कमी झाली, तर ही आव्हाने अधिक तीव्र होऊ शकतात. लहान ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशनच्या सेंटर फॉर न्यू इकॉनॉमिक डिप्लोमसी येथे सिनियर फेलो आहेत.

## मेट्रो ६ चे काम ८८ टक्क्यांहून अधिक पूर्ण

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई मेट्रो लाईन ६ मध्ये आणखी एक महत्वाचा टप्पा गाठला आहे. जोगेश्वरी येथे पश्चिम रेल्वे मार्गावर दुसरा स्टील कॉम्पोझिट गर्डर स्पॅन यशस्वीरीत्या उभारण्यात आला आहे. एमएमआरडीएने हे काम केवळ १ तास ३५ मिनिटांत पूर्ण केले आहे. या कामाच्या पूर्णत्वामुळे मेट्रो लाईन ६ च्या एकूण काम ८८ टक्क्यांहून अधिक झाले आहे.

या रेल्वे स्पॅनचे काम करण्यासाठी पश्चिम रेल्वेला ३ तास १० मिनिटांच्या ट्रॅफिक ब्लॉक घ्यावा लागेल असे अपेक्षित होते.

प्रत्यक्षात मात्र एमएमआरडीएने ते केवळ एक तास ३५ मिनिटांत पूर्ण केले आहे. या नव्या स्पॅनची लांबी ३१.१६ मीटर असून वजन सुमारे ९० मेट्रिक टन आहे. या संरचनेत स्टील कॉम्पोझिट गर्डर्स, डायफ्राम्स आणि ब्रेसींग सिस्टिमचा समावेश असून, दीर्घकालीन मजबुती आणि सुरक्षितता लक्षात घेऊन त्याची रचना करण्यात आली आहे.

या संपूर्ण कामात ओव्हरहेड इक्विपमेंट बंद करणे, वायर खाली घेणे, क्रेनची उभारणी, जड स्पॅन उचलणे, अचूक बसविणे, स्ट्रक्चरल फिक्सिंग, तपासणी आणि रेल्वे व्यवस्था पुन्हा सुरू करणे अशा अनेक गुंतागुंतीच्या टप्प्यांचा समावेश होता. हे सर्व काम अत्यंत मर्यादित वेळेत आणि अचूक समन्वयाने पूर्ण करण्यात आले. या कामासाठी ५०० टन आणि ६०० टन क्षमतेच्या हायड्रॉलिक क्रेन्सचा एकत्रित वापर करण्यात आला. ज्यामुळे कार्यरत रेल्वे मार्गावर स्पॅन अचूकपणे उभारणे शक्य झाले. या संपूर्ण प्रक्रियेसाठी एमएमआरडीए, कंत्राटदार आणि पश्चिम रेल्वे यांच्यात मिनिटागणिक समन्वय साधावा लागला.

रेल्वे मार्गावर सलग दोन स्टील स्पॅन यशस्वीरीत्या उभारण्यात आल्यानंतर, मेट्रो लाईन ६ मधील सर्वात महत्वाच्या अभियांत्रिकी आव्हानांपैकी एक टप्पा पूर्ण करण्यात एमएमआरडीएला मोठे यश मिळाले आहे. ही मार्गिका कार्यरत झाल्यानंतर स्वामी समर्थ नगर (अंधेरी लोखंडवाला) ते विक्रोळी दरम्यान धावणारी मेट्रो लाईन ६ मुंबईतील पूर्व-पश्चिम दळणवळण मोठ्या प्रमाणात सुधारून प्रवासाचा वेळ कमी होईल.

## उषा मंगेशकर, हरिहरन, संजीव कपूर, राही भिडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**मुंबई, प्रतिनिधी**

ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर, गझल तसेच पार्श्वगायक हरिहरन, सेलिब्रिटी शेफ संजीव कपूर, अभिनेत्री सुषमा देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे व बीड जिल्हात एचआयव्ही एड्सग्रस्त मुलांच्या संगोपन व पुनर्वसनासाठी कार्य करीत असलेले दत्ता बारगजे व संध्या बारगजे यांना आज जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १ मे) मुंबई येथे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आफ्टरनून व्हॉइस माध्यमातर्फे आयोजित '१८ व्या न्यूजमेकर्स अचिव्हर्स' पुरस्कार सोहळ्याला ज्येष्ठ भरतनाट्यम विदुषी डॉ संध्या पुरेचा, अभिनेते व जाहिरात क्षेत्रातील तज्ज्ञ भरत दाभोळकर, आफ्टरनून व्हॉईसच्या संपादिका डॉ वैदेही तमन व राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे प्रामुख्याने उपस्थित होते.

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लोकांना सन्मानित केल्यास त्यातून समाजाला प्रेरणा मिळते, असे सांगून जीवन गौरव पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींचे योगदान फार मोठे असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना शेफ संजीव कपूर यांनी लोकांना घरचे भोजन नेहमी चांगले असा मूलमंत्र दिला. 'घरच्या भोजनात प्रेम असते तर बाहेरच्या भोजनात व्यवहार असतो' असे त्यांनी सांगितले. पार्श्वगायक हरिहरन यांनी यावेळी 'तू ही रे, तेरे बिना मै कैसे जिऊ' हे गाणे सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

महाराष्ट्राची भूमी प्रगतिशील विचार, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक समृद्धीचे प्रतीक आहे. राज्याला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा वारसा लाभला आहे.

आजही महाराष्ट्र उद्योग, संस्कृती, सुशासन आणि सामाजिक विकास या क्षेत्रांत देशाचे नेतृत्व करत आहे, असे सांगून समाज विविध आव्हानांना सामोरे जात असताना प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण या मूल्यांचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. आज सन्मानित होत असलेले सर्व व्यक्तिमत्त्वे या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहेत, असे राज्यपालांनी सांगितले.

## खारेगाव टोलनाका पुन्हा सुरू होणार

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका नऊ वर्षांनंतर पुन्हा सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. 2017 साली बंद करण्यात आलेला हा टोलनाका आता नव्या रस्ते प्रकल्पामुळे पुन्हा उभारला जात आहे. समृद्धी महामार्गाशी जोडणाऱ्या आमने ते ठाणे या दहा पदरी मार्गिकेच्या कामामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे मुंबईकडे जाणारा प्रवास वेगवान होणार असला तरी ठाणे, कल्याण, भिवंडी, नवी मुंबई आणि मुंबईकडे येणाऱ्या वाहनचालकांना पुन्हा टोलचा आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

मुंबई नाशिक महामार्गावरील माजिवडा ते वडपे या 23 किमी लांबीच्या प्रकल्पाचं काम 90 टक्के पूर्ण झालं आहे. येत्या काही महिन्यात या मार्गिकेच्या निर्माणाचं काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई-नाशिक महामार्ग आणि समृद्धी महामार्गावरून मुंबईच्या दिशेने होणारा प्रवास वेगवान होणार आहे. मात्र असं असलं तरी वाहनचालकांना टोलचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

मुंबई नाशिक महामार्गावर खारेगाव इथे असलेला टोलनाका 2017 साली बंद करण्यात आला. मात्र आता समृद्धी महामार्गाला जोडण्यासाठी आमने ते ठाणे असा दहा पदरी रस्ता तयार करण्यात आल्याने पुन्हा एकदा खारेगाव इथे टोलनाक्याची उभारणी सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान या निर्णयाला मनसेने विरोध केला आहे. काहीही झाले तरी टोलनाका उभारू देणार नाही असा पवित्रा मनसेने तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने घेतला आहे. टोलच्या नावाखाली सरकार सामान्यांची लूट करत आहे अशी टीका मनसे नेते अविनाश जाधव यांनी केली. तर हा नाका बंद पाडण्याचा इशारा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी दिला आहे.

१९९८ या वर्षी खारीगाव टोलनाका सुरु झाला होता. टोलवसूली विरोधात अनेकदा आंदोलन देखील झाले होते. २०१७ मध्ये हा टोलनाका कायमस्वरुपी बंद करण्यात आला होता. त्यामुळे ठाणे ते भिवंडी, कल्याण आणि ठाणे ते भिवंडी, नाशिक, उरण जेएनपीए येथील हजारोहलकी, जड-अवजड वाहन चालकांना टोलपासून मुक्तता मिळाली होती. भविष्यात ठाणे कोस्टल रोडही या मार्गिकेशी जोडला जाणार असल्याने वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्य रस्ते विकास महामंडळ 15 वर्षे देखभाल करणार असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण टोल वसुली करणार आहे.

## धारावती तळ मजल्यावरील पात्र रहिवाशांचेच प्रतिज्ञापत्र वरच्या मजल्यासाठी ग्राह्य धरणार

**मुंबई, प्रतिनिधी**

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या आजवरच्या निकषांना छेद देत, धारावी पुनर्विकास प्रकल्पात वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांनादेखील घर देण्याचा ऐतिहासिक निर्णय राबविण्यात येणार आहे. मात्र, वरच्या मजल्यावरील घराची पात्रता ही मुख्यत्वे तळमजल्यावरील घराच्या पात्रतेवर अवलंबून असणार आहे.

शासन निर्णयानुसार १५ नोव्हेंबर २०२२ पूर्वी धारावीत वास्तव्याला असणाऱ्या वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांनादेखील पुनर्विकासात सामावून घेतले जाणार आहे. या सदनिकाधारकांना धारावीबाहेर, मात्र मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) ३०० चौरस फुटांचे घर मिळू शकेल. त्यासाठी त्यांना भाडेकरार - खरेदी (हायर परचेस) योजनेचा लाभ घेता येईल किंवा २५ वर्षांसाठी नाममात्र भाडे भरून २६ व्या वर्षी घराचा मालकी हक्क मिळवता येईल. तसेच उर्वरित रक्कम अदा करून २५ वर्षांच्या कालावधीत कधीही घराचे मालक होता येईल.

'वास्तविक, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना कोणताही लाभ न देता प्रकल्पातून वगळले जाते. मात्र, धारावी पुनर्विकास प्रकल्प याला अपवाद आहे. वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना पुनर्विकासात सामावून घेणारा हा देशभरातील पहिला प्रकल्प असेल. या निर्णयामुळे हा प्रकल्प अधिकाऱ्याने दिली. मानवकेंद्रित आणि सर्वसमावेशक असल्याचे स्पष्ट झाले आहे' अशी प्रतिक्रिया धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) 'हायर-परचेस महत्त्वपूर्ण धोरणातील तरतुदींमुळे धारावीकरांना हक्काचे घर सहजरित्या घेता येऊ शकेल. भाडेकराराची उर्वरित रक्कम भरून हवे तेव्हा घराचा मालकी हक्क धारावीकरांना मिळवता येईल' अशी पुस्तीही त्यांनी जोडली. पुनर्विकासाचा लाभ घेण्यासाठी मजल्यावरील सदनिकाधारकांना, अंतिम मुदतीपूर्वीच्या (कट ऑफ डेट) वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागेल. वरच्या त्यासाठी ४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद प्राधान्यक्रमानुसार केलेल्या दस्तावेजांची पूर्तता करावी लागेल. पात्रतेच्या प्राधान्यक्रमातील शेवटच्या पर्यायात जर तळमजल्यावरील सदनिकाधारक आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करता आपली पात्रता सिद्ध करू शकला नाही, तर वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांची पात्रता देखील धोक्यात येऊ शकते. 'अशा परिस्थितीत पात्रतेसाठी कोणतेही प्रतिज्ञापत्र विचारात घेतले जाणार नाही,' अशी माहिती 'डीआरपी' अधिकाऱ्यांनी दिली.



## मुद्रांक आणि नोंदणी कार्यालयांचे 'रेलटेल'कडून आधुनिकीकरण

**मुंबई, प्रतिनिधी**

मुद्रांक आणि नोंदणी विभागाच्या कार्यालयांचे आधुनिकीकरण करण्यासाठी राज्य सरकारने 'रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची नियुक्ती केली आहे. नागरिकांना अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि तंत्रज्ञान-आधारित सेवा मिळाव्यात यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. 'रेलटेल' या उपक्रमावर ५८७दुय्यम निबंधक आणि प्रशासकीय कार्यालयांच्या सर्वसमावेशक आधुनिकीकरणाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर पाच वर्षांसाठी राबवला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना मध्यवर्ती सर्व्हर, संगणकीय पायाभूत सुविधा, नेटवर्क, सीसीटीव्ही, सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म आणि आवश्यक कार्यालयीन साहित्याची जोड दिली जाईल.

## 'टीबी मुक्त भारत' अभियान झोपडपट्ट्यांपर्यंत नेण्याचा राज्यपालांचा संकल्प

**मुंबई, प्रतिनिधी**

'टीबी मुक्त भारत अभियान' मुंबईतील प्रत्येक झोपडपट्टीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुक्रवारी लोकभवन, मुंबई येथे व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त लोकभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांनी 'टीबी मुक्त भारत – लोकभवन महाराष्ट्र उपक्रम' या विषयावरील पोस्टरचे अनावरण केले. उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या देशातून क्षयरोग निर्मूलनाच्या आवाहनाशी सुसंगत असल्याचे सांगितले. मुंबईतील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्ट्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## पायधुनीत १४.१६ लाखांचे ई-सिगारेट्स जप्त; ४ जणांना अटक

**मुंबई, प्रतिनिधी**

गुन्हे शाखेच्या युनिट २ ने पायधुनी परिसरात कारवाई करत १४.१६ लाख रुपयांचे प्रतिबंधित ई-सिगारेट्स जप्त केले आहेत. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक तेजाणकर यांना ३० एप्रिल रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पायधुणी येथील कोळसा गल्लीत ही कारवाई केली. रात्री ९:१० च्या सुमारास सापळा रचून २२ वर्षीय अब्दुल अस्लाम रेहमान याला ई-सिगारेट्सची पिशवी बाळगताना रंगेहात पकडण्यात आले. त्याच्याकडून १.३५ लाख किमतीचे ४५ ई सिगारेट्स जप्त करण्यात आले. चौकशीत रेहमानने हा साठा ३४ वर्षीय सलमान जुनेद जवेरी याच्याकडून घेतल्याची माहिती दिली. यावरून पोलिसांनी कोळसा गल्लीतील अल हुसैनी हाइट्स येथील जवेरीच्या घरावर छापा टाकत २.४९ लाख किमतीचे ८३ ई-सिगारेट्स जप्त केले. यानंतर याच इमारतीजवळून २४ वर्षीय मोहम्मद हारून खेराडिया याला अटक त्याच्याकडून २.९७ लाख किमतीचे ९९ ई-सिगारेट्स जप्त केले. खेराडियाच्या माहितीनुसार, पोलिसांनी झकारिया मशीद रस्त्यावरून २२ वर्षीय मोहम्मद फैजान जफर हकम याला ताब्यात घेऊन ७.३५ लाख किमतीचे २४५ ई-सिगारेट्स जप्त केले. दोन दिवसांत गुन्हे शाखेने १४.१६ लाख किमतीचे ४७२ प्रतिबंधित ई-सिगारेट्स जप्त केले आहेत. करण्यात आली.

## बोगस आयडी बनवून तरुणीची बदनामी

**मुंबई, प्रतिनिधी**

इन्स्टाग्रामवर बोगस आयडी बनवून एका तरुणीची अज्ञात व्यक्तीने बदनामी केल्याचा प्रकार खार परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून खार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध आयटी कलमांर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरु केला आहे. २२ वर्षांची तक्रारदार तरुणी तिच्या कुटुंबीयांसोबत खार परिसरात राहात असून एका खासगी कंपनीत कामाला आहे. २८ एप्रिलला तिला तिच्या एका मैत्रिणीने कॉल करुन तिच्या नावाने इन्स्टाग्रामवर एक नवीन आयडी तयार करण्यात आले आहे. या आयडीवरून तिच्या परिचित मित्र-मैत्रिणींना मॅसेज पाठविले जात आहे, अशी माहिती दिली होती. काही वेळानंतर तिने तिला त्या आयडीचा स्क्रिनशॉट पाठविला होता. स्क्रिनशॉटमधील मॅसेज पाहिल्यानंतर तिने संबंधित आयडी ब्लॉक करून अज्ञात व्यक्तीला तिच्या आईच्या आयडीवरून जाब विचारण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने तिला प्रतिसाद दिला नाही. काही वेळानंतर त्याने तिला काही अश्लील संभाषण केलेले मॅसेज पाठवून शिवीगाळ केली होती. त्यानंतर खार पोलिसांना सांगून तक्रार दाखल केली होती.

### फ्लॅटमालक असल्याचे सांगून शिक्षिकेची फसवणूक

**मुंबई, प्रतिनिधी**

फ्लॅट मालक असल्याचे सांगून एका शिक्षिका महिलेसोबत फ्लॅटचा व्यवहार करुन तिची दहा लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी बलराम अमरदेव पोखारीवाला या आरोपीस समतानगर पोलिसांनी अटक केली. याच गुन्ह्यांत विमल विठ्ठल नागरे, अलका गोरक्षनाथ दिघे, चंदा रोहिदास वाकचौरे, नंदा भाऊसाहेब वर्धे, मनीषा अशोक वर्षे, राजू बेलू पल्लर आणि प्रियांका कल्पेश दिघे असे सात जण सहआरोपी असल्याचे पोलिसांनी सांगितले. तक्रारदार महिला ही शिक्षिका असून ती तिच्या पती आणि दोन मुलांसोबत कांदिवली परिसरात राहते. २०२१ रोजी बलराज आणि राजू पल्लरने तिला कांदिवलीतील जिवलापाडा, स्वप्नपूर्वी एसआरए इमारतीच्या ३०४ क्रमांकाचा फ्लॅट दाखविला होता. या फ्लॅटचे मालक असल्याचे सांगून त्यांनी तिच्याशी फ्लॅटचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केला. तिच्याकडून दहा लाख रुपये घेऊन तिला फ्लॅटचा ताबा दिला. मात्र काही महिने उलटूनही त्यांनी तिला फ्लॅटची कागदपत्रे दिली नाहीत. २७ मार्च २०२६ तिच्या घरी राजू, बलरामसह इतर सहा महिला आल्या होत्या. काही कळण्यापूर्वीच त्यांनी तिच्या घरात प्रवेश करुन घरातील सर्व सामान बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती प्राप्त होताच समतानगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. यावेळी शिक्षिकेच्या घरी घुसलेल्या सहाही महिलांना ताब्यात घेतले होते.

## मानसशास्त्र विभागात प्रवेश सुरू

**मुंबई, प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र विभागात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, देशभरातील मानसशास्त्र विद्यार्थ्यांसाठी ही एक महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होत आहे. मुंबई विद्यापीठाच्या विभागात असलेल्या एम.ए. मानसशास्त्र (२ वर्षे), पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन सायकोलॉजी (१ वर्ष), बी. ए. ऑनर्स आणि बी. ए. ऑनर्स विथ रिसर्च (अंतिम चौथे वर्ष) आणि पीएचडी (३ ते ४ वर्षे) असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. एम. ए. अंतर्गत क्लिनिकल मानसशास्त्र, काउन्सलिंग मानसशास्त्र, इंडस्ट्रीयल-ऑर्गनायझेशनल मानसशास्त्र आणि सामाजिक व समुदाय मानसशास्त्र अशी चार प्रमुख स्पेसिलाइझेशन उपलब्ध आहेत. दरवर्षी सुमारे १०० जागांसाठी ८०० ते १००० अर्ज प्राप्त होत असल्याने प्रवेश प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक ठरते. विभागामध्ये स्मार्ट क्लासरूम्स, प्रायोगिक मानसशास्त्र प्रयोगशाळा, मानसशास्त्रीय चाचणी प्रयोगशाळा आणि ॲक्टिव्हिटी स्पेस अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. तसेच व्यक्तिमत्व, भाषा व संस्कृती, हवामान बदल व शाश्वतता, सैद्धांतिक मानसशास्त्र आणि चिंता व मानवी स्थिती यांसारख्या विषयांवर विशेष संशोधन प्रयोगशाळाही कार्यरत आहेत. विभागात विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक शिक्षण न देता मानसशास्त्रीय मूल्यांकन, निदान, समुपदेशन व मानसोपचार यामध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता व मानसशास्त्राचा समन्वय, कोडिंग, एक्सपेरिमेंटल डिझाईन आणि मानसशास्त्रीय चाचण्यांची निर्मिती यावरही भर दिला जातो. हॉस्पिटल्स, कम्युनिटी प्रोजेक्ट्स, इंडस्ट्री आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळवून दिला जातो. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी असलेल्या सहकार्यामुळे संशोधन आणि करिअरच्या विस्तृत संधीही उपलब्ध होतात, अशी माहितीही विद्यापीठाने दिली आहे.

### नसरापूर अत्याचार प्रकरणी बाल हक्क आयोग सक्रिय

## कठोर शिक्षेसाठी विशेष सरकारी वकील नियुक्तीची शिफारस

**मुंबई, प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. आयोगाच्या सदस्या शुभांगीताई तांबट यांनी आज सकाळी पीडित बालिकेच्या घरी भेट देऊन तिच्या पालकांशी व नातेवाईकांशी संवाद साधला. यावेळी आयोगाच्या वतीने कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करण्यात आल्या.

पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आयोग सक्रिय झाला आहे. या प्रकरणाची माहिती मिळताच आयोगाने पोलीस प्रशासनाकडून तपशील मागवून चौकशीला सुरुवात केली आहे. दरम्यान, पुणे-बेंगलोर महामार्गावर झालेल्या रास्ता रोको आंदोलनाच्या वेळीही आयोगाची उपस्थिती होती.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याची आणि खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्याची शिफारस शासनाकडे करण्यात येणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. तसेच न्याय मिळेपर्यंत आयोग पीडित कुटुंबासोबत ठामपणे उभा राहणार असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

## राणी बागेत लवकरच रॉयल बंगाल वाघाची एण्ट्री

**मुंबई, प्रतिनिधी**



बिबट्या, मगर, वाघ, कोल्हे हे प्राणी राणी बागेत येणाऱ्या पर्यटकांचे खास आकर्षण आहेत. यात आता भर पडणार आहे ती बंगालच्या रॉयल टायगर्सची. नागपूर येथील गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाने भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान वनस्पती व प्राणीसंग्रहालयास वाघाची जोडी देण्याची तयारी दर्शवली आहे. गोरेवाडा झू प्राधिकरणाकडून राणी बागेत रॉयल बंगाल टायगर्सची जोडी यावी यासाठी केंद्रीय झू प्राधिकरणाला पत्रव्यवहार केला असून लवकरच केंद्रीय झू प्राधिकरणाची मंजुरी मिळेल, असा विश्वास राणी बाग प्राणीसंग्रहालयातील अधिकाऱ्याने व्यक्त केला.

गुजरातच्या सक्करबाग प्राणीसंग्रहालयातून सिंहांची जोडी आणण्यासाठी महापौर रितू तावडे प्रयत्नशील असून त्या स्वतः गुजरातच्या सक्करबाग प्राणीसंग्रहालयाला भेट देणार असून गुजरातच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत. तर दुसरीकडे नागपूर येथील गोरेवाडा प्राधिकरणाने रॉयल बंगाल टायगर्सची जोडी भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान वनस्पती व प्राणीसंग्रहालयात देण्यास होकार दिला आहे. याबाबत केंद्रीय झू प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला असून मंजुरी मिळताच लवकरच राणी बागेत रॉयल बंगाल टायगर्सची जोडी पर्यटकांच्या भेटीला येईल, असा विश्वास राणी बाग प्राणीसंग्रहालयातील अधिकाऱ्याने व्यक्त केला.

घेवाण तत्त्वावर आणली होती. छत्रपती संभाजीनगर येथील सिद्धार्थ उद्यान व प्राणिसंग्रहालयातून १२ फेब्रुवारी २०२० ला भायखळातील राणी बागेत 'शक्ती' (नर), 'करिश्मा' (मादी) ही रॉयल बंगाल वाघाची जोडी देवाण-तेव्हापासून ही जोडी मुख्य आकर्षण ठरली होती. उद्यानात येणारे पर्यटक 'शक्ती' व 'करिश्मा'ला पाहण्यासाठी गर्दी करीत असत. 'करिश्मा' वाघीणीने ४ नोव्हेंबर २०२२ ला दोन रुबाबदार नर बछड्यांना जन्म दिला. त्यांची नावे 'जय' आणि 'रुद्र' अशी ठेवण्यात आली. आजारपणामुळे २०२४ मध्ये 'रुद्र' चा मृत्यू झाला. २०२५ मध्ये 'शक्ती' वाधाचाही मृत्यू झाला. आता 'करिश्मा' आणि 'जय' हे नर-मादी वाघ राणी बागेत आहेत. हे दोन्ही रॉयल बंगाल वाघ आहेत. या वाधांनाही पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. आता त्यांच्या जोडीला आणखी नर-मादी वाधाची जोडी आणण्यासाठी राणी बाग प्राणीसंग्रहालय प्रयत्न करत आहे.

नागपूरमधील गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाशी पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांनी होकार दर्शविला आहे. त्यानंतर गौरावाडा प्राणीसंग्रहालयाने सेन्ट्रल झू ऑथॉरिटीकडे प्रस्ताव पाठवला असून त्यांच्याकडून मंजुरी मिळताच गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाकडून राणी बागेला वाघाची जोडी दिली जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. त्याबदल्यात पक्षी किंवा प्राणी राणी बाग प्राणीसंग्रहालयाकडून गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाला देण्यात येणार आहेत.

## एल आय टी जगाला उत्तम इंजिनियर्स देईल- मुख्यमंत्री

### एल आय टी च्या प्रस्तावित संकुलाचे भूमिपूजन



**नागपूर प्रतिनिधी**

आठ दशकांपासून कार्यरत असलेल्या लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ चे विद्यार्थी आज जगभरात आहेतच, परंतु भविष्यातही देशाला व जगाला उत्तम इंजिनियर्स देण्याचे काम एल आय टी करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांच्या एकत्रित बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज सकाळी झाले. त्यानंतर ते बोलत होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

काही वर्षांपूर्वी या संस्थेला विद्यापीठाचा दर्जा दिल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, त्यामुळे दर्जा तर वाढलाच परंतु आता येथे भव्य व सुंदर शैक्षणिक संकुल उभारण्यात येणार आहे. एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक केंद्र म्हणून या विद्यापीठाची ओळख असेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

प्रारंभी दीप प्रज्वलन झाले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी भूमिपूजन केले. प्रास्ताविक कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी केले. लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, (एल आय टी) या संस्थेला मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाचा दर्जा दिला त्यानंतर या संस्थेचे नाव लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ झाल्याचे डॉ. वैद्य यांनी प्रास्ताविकात सांगितले. कार्यक्रमाचे संचालन सौरभ जोगळेकर यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. नीरज खटी यांनी मानले. आ. विकास ठाकरे, आ. कृपाल तुमाने, विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गणपती यादव, प्रमुख सल्लागार मोहन पांडे प्रभृती यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते

## कारागृहात असलेल्या बेकायदा परदेशी नागरिकांच्या हकालपट्टीसाठी गुन्हे मागे घेणार

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने कारागृहात असलेल्या बेकायदा परदेशी नागरिकांच्या देशातून हकालपट्टीची प्रक्रिया जलद करण्यासाठी त्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेले फौजदारी गुन्हे मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. २५ मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयामुळे सुमारे ३,५०० हून अधिक बेकायदा परदेशी नागरिकांवर परिणाम होण्याची शक्यता असून, यामध्ये बहुतांश नागरिक बांगलादेश येथील असल्याचे सांगितले जात आहे.

या शासन निर्णयानुसार जिल्हा आणि राज्य स्तरावर समित्या स्थापन करून बेकायदा परदेशी नागरिकांविरुद्ध दाखल प्रकरणांची छाननी केली जाणार आहे. देशातून हकालपट्टी करण्यासाठी कोणती प्रकरणे मागे घेता येतील, याचा निर्णय या समित्या घेतील. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ३,५०० पेक्षा अधिक परदेशी नागरिकांमध्ये केवळ सध्या कारागृहात असलेलेच नव्हे, तर जामिनावर सुटल्यानंतर फरार झालेले आरोपीदेखील समाविष्ट आहेत.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातून सुमारे २,९०० बांगलादेशी नागरिकांना परत पाठविण्यात आले आहे. यापूर्वी बनावट कागदपत्रांच्या आधारे राज्यात वास्तव्य करणाऱ्यांवर कारवाई केली जात होती. मात्र नव्या निर्णयानुसार आता गुन्हेगारी प्रकरणांत अडकलेल्या आणि तुरुंगात असलेल्या परदेशी नागरिकांनाही हकालपट्टीच्या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येणार आहे.

हा निर्णय भारताचे गृहमंत्रालय यांनी नोव्हेंबरमध्ये जारी केलेल्या निर्देशांनंतर घेण्यात आला. या मार्गदर्शक सूचनांनुसार, ज्या प्रकरणांमध्ये कमाल शिक्षा १० वर्षांपेक्षा कमी आहे, अशा प्रकरणांत गुन्हे मागे घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, अनेक परदेशी नागरिक व्हिसाची मुदत संपल्यानंतर भारतात राहण्यासाठी जाणूनबुजून किरकोळ गुन्हे करत किंवा पासपोर्ट फाडून टाकत होते. त्यामुळे त्यांच्यावर खटले सुरू राहत आणि न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना परत पाठवणे शक्य होत नसे. अनेकदा जामिनावर सुटल्यानंतर ते फरार होत असत. त्यामुळे या कायदेशीर पळवाटेचा गैरवापर रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार, भारतीय नागरिक नसलेल्या आणि किरकोळ गुन्ह्यांमध्ये अनेक वर्षे कारागृहात असलेल्या किंवा फरार असलेल्या आरोपींच्या प्रकरणांची समित्यांकडून तपासणी केली जाणार आहे. त्यानुसार पात्र प्रकरणे मागे घेऊन संबंधितांना त्यांच्या मूळ देशात परत पाठविण्यात येईल.

शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे की, काही परदेशी नागरिक भारतातील वास्तव्य वाढवण्यासाठी किंवा हकालपट्टी टाळण्यासाठी गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी होत आहेत आणि त्यानंतर कायदेशीर किंवा तांत्रिक मार्गांचा वापर करून भारतात राहण्याचा प्रयत्न करत आहेत. हे लक्षात घेऊन २०२४ मध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत अशा नागरिकांच्या तातडीने हकालपट्टीसाठी धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम ३६० अन्वये कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत राहील. त्यात जिल्हा पोलीस अधीक्षक, मुख्य सरकारी वकील आणि संबंधित सरकारी वकील सदस्य असतील. शहरांमध्ये पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्य करेल आणि शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार कोणती प्रकरणे मागे घेता येतील, याचा निर्णय घेतला जाईल.

## मुंबईतील महापालिकेची कामे तृतीयपंथीयांना देण्याची मागणी

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालये, रूग्णालये, शाळा, उद्याने व इतर सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा रक्षक पदांसाठी तृतीयपंथीय व्यक्तीची भरती करण्यात यावी, यासाठी आवश्यक प्रशिक्षण, प्रमाणपत्र आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबवून त्यांना सक्षम करण्यात यावे, जेणेकरून त्यांना सन्मानपुर्वक उपजीविकेची संधी मिळेल आणि समाजातील मुख्य प्रवाहात त्यांचा सहभाग वाढेल, यासाठी विभागीय तृतीयपंथीय व्यक्ती हक्क संरक्षण व कल्याण मंडळ, मुंबई विभागातील सह अध्यक्ष सोनाली चौकेकर यांनी महापौर रितू तावडे यांच्याकडे केली. याप्रकरणी त्यांनी महापौर तावडे यांची भेटही घेतली आहे. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या ट्रान्सजेंडर धोरण २०२४ अंतर्गत ट्रान्सजेंडर व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या धोरणाचा प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, विशेषतः बृहन्मुंबई महानगरपालिका याची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. असेही चौकेकर यांनी सांगितले.

# सारा की जगह कल्याणी बनेंगी 'मधुबाला'





बॉलीवुड की दिग्गज अभिनेत्री मधुबाला की बायोपिक को लेकर लगातार नई-नई चर्चाएं सामने आ रही हैं। फिल्म में मधुबाला की भूमिका कौन निभाएगा, इसको लेकर हर रोज नए नाम सामने आ रहे हैं। कियारा आडवाणी, अनीत पड्डा, तृप्ति डिमरी और सारा अर्जुन के बाद अब संजय लीला भंसाली के प्रोडक्शन हाउस में बनने वाली इस फिल्म में एक नई एक्ट्रेस के लीड रोल में नजर आने की चर्चाएं चल रही हैं। बॉलीवुड के बाद अब चर्चाएं साउथ की एक अभिनेत्री के मधुबाला के किरदार में नजर आने की हैं।

**सारा नहीं कल्याणी प्रियदर्शन से मेकर्स ने किया संपर्क**

कुछ दिन पहले खबर आई थी कि 'धुरंधर 2' की अभिनेत्री सारा अर्जुन से फिल्म में मुख्य भूमिका निभाने के लिए संपर्क किया गया है, लेकिन अब रिपोर्ट्स के अनुसार इस भूमिका के लिए एक दक्षिण भारतीय अभिनेत्री से संपर्क किया गया है। वह अभिनेत्री कोई और नहीं बल्कि 'लोका चैप्टर 1' की एक्ट्रेस कल्याणी प्रियदर्शन हैं।

रिपोर्ट के मुताबिक भारतीय सिनेमा की सबसे लोकप्रिय अभिनेत्रियों में से एक को भव्य ट्रिब्यूट देने के उद्देश्य से बनाई जा रही इस फिल्म के निर्माता 'लोका' की सफलता के बाद कल्याणी को साइन करने के लिए बेहद उत्सुक हैं।

**जसमीत के. रीन कर रहे निर्देशन**

बॉलीवुड की खूबसूरत अभिनेत्री मधुबाला की बायोपिक का निर्देशन जसमीत के. रीन करेंगे। उन्होंने इससे पहले आलिया भट्ट, शेफाली शाह और विजय वर्मा की फिल्म 'डार्लिंग्स' का निर्देशन किया था। रिपोर्ट्स के मुताबिक, कल्याणी प्रियदर्शन की बढ़ती लोकप्रियता, उनकी मासूमियत और पर्दे पर दिखने वाला आकर्षण उन्हें इस प्रोजैक्ट के लिए उपयुक्त बनाता है।

**'लोका' से कल्याणी को मिली व्यापक सफलता**

कल्याणी दिग्गज फिल्ममेकर प्रियदर्शन की बेटी हैं। उन्होंने 2017 में अखिल अक्कीनेनी के साथ फिल्म 'हेलो' से अपने अभिनय करियर की शुरुआत की थी। इसके बाद उन्होंने 'चित्रलहरी', 'रणरंगम', 'वरणे अवश्यामुंड', 'मानाडू', 'थल्लुमाला', 'वर्षंगलक्कू शेषम' जैसी कई फिल्मों में काम किया है। हालांकि, कल्याणी को व्यापक सफलता पिछले साल आई फिल्म 'लोकाः चैप्टर 1' से मिली। कल्याणी प्रियदर्शन के वर्कफ्रंट की बात करें तो वह भुवनेश अर्जुनन द्वारा निर्देशित, 'जीनी' में नजर आएंगी। इस फिल्म में रवि मोहन और कीर्ति शेट्टी भी हैं।



# मैं गलतियां करने से नहीं डरतीः मृणाल ठाकुर

मृणाल ठाकुर अपनी हालिया रिलीज फिल्म 'डकैत' को लेकर चर्चाओं में हैं। फिल्म को क्रिटिक्स और दर्शकों से मिली-जुली प्रतिक्रिया हासिल हो रही है। इस बीच मृणाल ठाकुर ने यह स्वीकार किया कि उनमें आत्मविश्वास की कमी है। साथ ही उन्होंने बताया कि वह कैसे सब्जैक्ट बेस सिनेमा और कमर्शियल फिल्मों के बीच संतुलन बनाकर रखती हैं?

**मैं गलतियां करने से नहीं डरती**

बातचीत के दौरान मृणाल ठाकुर ने माना कि उन्हें इतनी भूमिकाएं निभाने के बावजूद आत्मविश्वास की कमी महसूस होती है। एक्ट्रेस ने कहा कि मुझे कभी-कभी आत्मविश्वास की कमी महसूस होती है। मुझे नहीं पता क्यों। सच कहूं तो, मैं जानना भी नहीं चाहती। ईमानदारी से कहूं तो कभी-कभी लोग मुझसे कहते हैं कि तुम अपनी प्रतिभा या खुद को कम आंकती हो, लेकिन मुझे नहीं पता। वैसे यह एक ऐसी चीज है जिस पर मैं काम कर रही हूं। इससे मुझे घबराहट होती है, लेकिन आज भी इसे स्वीकार करने के लिए मुझे बहुत साहस की आवश्यकता पड़ती है। आज मैं यहां हूं, निडर होकर आप सबके सामने बैठी हूं, गलतियां करने से नहीं डरती।'

**मुझे बहुत कुछ साबित करना है**

एक्ट्रेस ने माना कि वह अपने काम को लेकर काफी महत्वाकांक्षी हैं। उन्होंने कहा कि मैं आज बहुत खुश हूं। मैं बस आनंद लेना चाहती हूं, नई चीजें खोजना चाहती हूं और आज की पीढ़ी की सर्वश्रेष्ठ अभिनेत्रियों में से एक के रूप में पहचान बनाना चाहती हूं। यही मेरा सपना है। इसके अलावा मुझे कमर्शियल सफलता के मामले में इसे साबित करना होगा। मुझे बहुत सी चीजें साबित करनी हैं।

**विषय आधारित सिनेमा पर कही ये बात**

मृणाल ने बॉक्स ऑफिस बनाम विषय-आधारित सिनेमा पर चल रही बहस पर भी बात की। कमर्शियल सक्सैस पर एक्ट्रेस ने कहा कि देखिए मैं जिस तरह की भूमिकाएं चुनती हूं, जैसे कि सिद्धार्थ चतुर्वेदी के साथ मेरी पिछली फिल्म, यह एक बहुत ही चुनौतीपूर्ण क्षेत्र है क्योंकि हम जिस तरह की फिल्में करना चाहते हैं, जैसे उनकी 'धड़क 2' किसी विशेष मुद्दे पर केंद्रित होती हैं, लेकिन जरूरी नहीं कि उन्हें वह व्यावसायिक सफलता मिले जिसकी वे हकदार हैं।

इसलिए कभी-कभी आपको अपने द्वारा चुने जा रहे किरदारों के बारे में बहुत सोच-समझकर फैसला लेना पड़ता है। मैं कोई भी किरदार तभी चुनती हूं जब मुझे वह पसंद आता है। मैंने कभी भी किसी फिल्म या किरदार को इसलिए नहीं चुना क्योंकि दूसरे मुझसे ऐसा चाहते हैं।

**मैं अभी खुद को खोज रही हूं और सीख रही हूं**



**मुझे कभी-कभी आत्मविश्वास की कमी महसूस होती है। मुझे नहीं पता क्यों। सच कहूं तो, मैं जानना भी नहीं चाहती। ईमानदारी से कहूं तो कभी-कभी लोग मुझसे कहते हैं कि तुम अपनी प्रतिभा या खुद को कम आंकती हो, लेकिन मुझे नहीं पता। वैसे यह एक ऐसी चीज है जिस पर मैं काम कर रही हूं।**

खुद को एक विकासशील कलाकार बताते हुए मृणाल ने कहा कि मैं अभी उस दौर में हूं जहां मैं खुद को खोज रही हूं, विकसित हो रही हूं और साथ ही गलतियां भी कर रही हूं। मैं बस एक-एक दिन करके आगे बढ़ रही हूं। मैं ऐसे फिल्म निर्माताओं के साथ काम करना चाहती हूं, जो मुझमें छिपी प्रतिभा को निखार सकें।

मैं ऐसे फिल्म निर्माताओं के साथ काम करना चाहती हूं, जो सच्ची कहानियां सुनाएं और मुझे सिर्फ एक हीरोइन के रूप में नहीं, बल्कि एक ऐसे किरदार के रूप में दिखाएं जिसके बिना फिल्म आगे नहीं बढ़ सकती। मैं अपनी आखिरी सांस तक काम करना चाहती हूं। यही मायने रखता है। नंबर एक बनने का दबाव, उस चूहा-दौड़ में शामिल होना, ये सब मायने नहीं रखता।

**मृणाल की पाइपलाइन में हैं कई बड़ी फिल्में**

वर्कफ्रंट की बात करें तो मृणाल ठाकुर की 'डकैत' हाल ही में सिनेमाघरों में रिलीज हुई है। इस फिल्म में मृणाल आदिवी शेष के साथ प्रमुख भूमिका में नजर आई हैं। यह एक एक्शन-लव स्टोरी है। इसके अलावा मृणाल की पाइपलाइन में 'है जवानी तो इश्क होना है' भी शामिल है। इसमें वह वरुण धवन और पूजा हेगड़े के साथ नजर आएंगी। इसके अलावा वह अल्लू अर्जुन और एटली की बहुप्रतीक्षित फिल्म 'राका' का भी हिस्सा हैं। इसमें दीपिका पादुकोण भी प्रमुख भूमिका में दिखेंगी।

# 'संकल्प' से वाहवाही लूट रही हैं रूप दुर्गापाल



उत्तराखंड के अल्मोड़ा की रहने वाली, छोटे पर्दे की एक्ट्रेस रूप दुर्गापाल ने 2006 में ग्राफिक एरा डीम्ड टू बी यूनिवर्सिटी से इंस्ट्रूमैंटेशन और कंट्रोल इंजीनियरिंग में बैचलर ऑफ टैक्नोलॉजी की डिग्री हासिल की और एक्टिंग में अपना करियर शुरू करने से पहले कुछ समय तक मल्टीनैशनल आईटी कंपनी 'इंफोसिस' में काम किया। रूप दुर्गापाल ने अपने एक्टिंग करियर की शुरुआत साल 2012 में 'सीआईडी' के एक सपीसोड में सुनीता के किरदार से की। उसके बाद उन्हें टीवी शो 'बालवीर' (2012-2013) में देखा गया। सीरियल 'बालिका वधू' (2012-2015) में 'सांची' के किरदार में रूप को जबरदस्त कामयाबी मिली। रूप दुर्गापाल ने 'अकबर बीरबल' (2015) में एक 'इच्छाधारी नागिन' का किरदार निभाया। उन्होंने कलर्स चैनल के शो 'स्वरागिनीः जोड़ें रिश्तों के सुर' (2016) में 'काव्या माहेश्वरी' और सोनी टीवी के शो 'कुछ रंग प्यार के ऐसे भी' (2016) में 'नताशा गुजराल' के शानदार किरदार निभाए। वह ज़िंग टीवी के लव स्टोरी पर आधारित एपिसोडिक शो 'प्यार पहली बार' (2018) में एक वकील 'शर्मिष्ठा' के मुख्य किरदार में थीं।

जी टीवी के सीरियल 'तुझसे है राब्ता' (2019) में उन्होंने पहली बार एक महाराष्ट्रीयन लड़की 'केतकी' का किरदार निभाया। वह एंड टीवी पर प्रसारित होने वाले रोमांटिक हॉरर शो 'लाल इश्क' (2019) और 'कुछ रंग प्यार के ऐसे भी' (2021) का हिस्सा भी थीं। उन्होंने सिल्वर स्क्रीन पर परफॉर्म करने के अलावा, थिएटर में भी काम किया है। वह टैलीविज़न विज्ञापनों में भी नजर आ चुकी हैं। हाल ही में अभिनेत्री रूप दुर्गापाल ने अमेजन एम एक्स प्लेयर पर 11 मार्च को ऑनस्ट्रीम हुई 10 एपीसोड वाली प्रकाश झा निर्देशित वैब सीरीज 'संकल्प' के जरिए ओटीटी डेब्यू किया है। इस सीरीज में एक्टर मोहम्मद जीशान अय्यूब की पत्नी माधुरी के किरदार में उनका काम हर किसी को खूब पसंद आ रहा है।

# 'वाराणसी' के बाद 'अमरी' में दिखेंगी प्रियंका चोपड़ा

**"फिल्म 'अमरी' की शूटिंग आधिकारिक तौर पर शुरू हो चुकी है। प्रियंका अपना पूरा शेड्यूल पूरा करने में व्यस्त हैं। वह आखिरी बार फिल्म 'द ब्लफ' में नजर आई थीं, जिसमें उन्होंने अभिनेता कार्ल अर्बन के साथ काम किया था। 'अमरी' के अलावा प्रियंका फिल्म 'वाराणसी' में नजर आएंगी।"**

ग्लोबल स्टार प्रियंका चोपड़ा इन दिनों भारतीय फिल्मों में वापसी की तैयारी कर रही हैं। महेश बाबू के साथ फिल्म 'वाराणसी' के बाद अब वह एक नई फिल्म पर काम कर रही हैं।

**प्रियंका ने की नई फिल्म 'अमरी' की शूटिंग शुरू**

प्रियंका इन दिनों अपनी नई फिल्म के लिए पंजाब के अमृतसर में रुकी हुई हैं। फिल्म 'अमरी' की शूटिंग आधिकारिक तौर पर शुरू हो चुकी है। प्रियंका अपना पूरा शेड्यूल पूरा करने में व्यस्त हैं। वह आखिरी बार फिल्म 'द ब्लफ' में नजर आई थीं, जिसमें उन्होंने अभिनेता कार्ल अर्बन के साथ काम किया था। 'अमरी' के अलावा प्रियंका फिल्म 'वाराणसी' में नजर आएंगी। 'वाराणसी' में प्रियंका साउथ अभिनेता महेश बाबू के साथ नजर आएंगी। इस फिल्म का निर्देशन एसएस राजामौली कर रहे हैं।

**प्रियंका ने किए स्वर्ण मंदिर के दर्शन**

इस महीने की शुरुआत में प्रियंका चोपड़ा को स्वर्ण मंदिर में प्रार्थना करते और रसोई में सेवा करते देखा गया था। हाल ही में उन्होंने फिर से स्वर्ण मंदिर जाकर प्रार्थना की। मीडिया रिपोर्ट्स के अनुसार, प्रियंका कुछ दिन पहले रात करीब 12 बजे स्वर्ण मंदिर में नजर आईं। वह वहां प्रार्थना कर रही थीं और परिक्रमा स्थल पर कुछ देर रुकीं।



# 'लव एंड वॉर' के सितारों की इतनी है नेटवर्थ

बॉलीवुड के दिग्गज डायरैक्टर संजय लीला भंसाली एक ऐसी फिल्म लेकर आ रहे हैं, जिसमें रणबीर कपूर, आलिया भट्ट और विक्की कौशल की तिकड़ी पहली बार एक साथ दिखेगी। पहले यह फिल्म 20 मार्च को रिलीज होने वाली थी, लेकिन अब इसकी तारीख आगे बढ़ा दी गई है। रिलीज में भले ही देरी हो, पर फैंस यह जानने को बेताब हैं कि उनकी इस पसंदीदा स्टारकास्ट में सबसे ज्यादा दौलत किसके पास है। आइए आपको पूरी डिटेल्स बताते हैं।

**आलिया भट्ट दौलत के मामले में सबसे आगे**

बॉलीवुड की 'गंगूबाई' यानी आलिया भट्ट आज के समय में कमाई के मामले में सबको पीछे छोड़ रही हैं। अपनी सुपरहिट फिल्मों और ब्रांड एंडोर्समैंट के दम पर आलिया ने काफी संपत्ति बनाई है। रिपोर्ट्स की अनुसार आलिया भट्ट की कुल नेटवर्थ 550 करोड़ रुपये से भी ज्यादा है।



रणबीर कपूर

**रणबीर कपूर लग्जरी लाइफ और करोड़ों की कमाई**

फिल्म 'एनिमल' की सफलता के बाद रणबीर कपूर का कद बॉलीवुड में और भी बढ़ गया है। अगर बात उनकी प्रॉपर्टी और कमाई की करें, तो रणबीर भी कुछ कम नहीं हैं। मीडिया रिपोर्ट्स के अनुसार, रणबीर की कुल नेटवर्थ करीब 345 करोड़ रुपये है, हालांकि वह फिल्म के लिए आलिया से ज्यादा फीस लेते हैं।



आलिया भट्ट



विक्की कौशल

**इतनी थी विक्की की 'सैम बहादुर' की नेटवर्थ**

'सैम बहादुर' और 'छावा' जैसी फिल्मों से अपनी एक्टिंग का लोहा मनवाने वाले विक्की कौशल भी काफी लग्जरी लाइफ जीते हैं, हालांकि नेटवर्थ के मामले में वह रणबीर और आलिया से थोड़े पीछे हैं। रिपोर्ट्स के मुताबिक विक्की की नेटवर्थ लगभग 41 करोड़ रुपये है।

**कौन है सबसे ज्यादा अमीर?**

अगर तीनों की तुलना करें, तो आलिया भट्ट अमीरी के मामले में नंबर-1 पर हैं। वहीं रणबीर कपूर दूसरे और विक्की कौशल तीसरे नंबर पर आते हैं। 'लव एंड वॉर' में इन तीन बड़े और रईस सितारों को एक साथ स्क्रीन शेयर करते देखना वाकई दिलचस्प होने वाला है। वैसे रिपोर्ट्स की मानें तो इसमें भाग्यश्री, सुप्रिया पाठक, बोमन ईरानी और शेफाली शाह जैसे कलाकार भी हो सकते हैं।

# ईरान-इजरायल युद्ध से भारत में भड़क सकती है महंगाई

## अब तो सरकार ने भी मान लिया

**नई दिल्ली, एजेंसी।** ईरान-इजरायल युद्ध की तपिश में भारतीय अर्थव्यवस्था भी झुलसेगी। जी हां, केंद्रीय वित्त मंत्रालय की मासिक आर्थिक रिपोर्ट में स्वीकार किया गया है कि पश्चिम एशिया संघर्ष से भारत के सप्लाई चेन को बड़ा झटका लगा है। इससे महंगाई भड़कने का जोखिम बढ़ गया है। वित्त मंत्रालय की तरफ से अप्रैल महीने के



